नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक
जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु.

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु. 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १२८ बुधवार, दि. ०२ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

शेतकऱ्यांच्या प्रश्नांनी गाजले अधिवेशन

सत्ताधारी-विरोधकांत शाब्दिक चकमक; सभापतींकडून आ. नाना पटोले निलंबित

जनता आवाज वृत्तसेवा

मुंबई : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज दुसरा दिवस. भाजप नेते बबनराव लोणीकर तसेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा मुद्दा नाना पटोले यांनी उपस्थित केला. परंतु, नाना पटोले यांनी असंसदीय शब्दाचा वापर केल्याचे म्हणत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ५ मिनिटांसाठी सभा तहकूब केली.

नाना पटोले यांनी मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी, अशी मागणी सभागृहात केली होती. नाना पटोले, विजय वडेट्टीवर थेट अध्यक्षाच्या डायसवर चढून राजदंडापुढे जाऊन लोणीकर प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागण्याची केली मागणी. त्यानंतर सभापतींनी नाना पटोलेंवर निलंबनाची कारवाई केली.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांच्या मुद्यावरून सत्ताधारी व विरोधकांत चांगलीच शाब्दिक चकमक उडाली. त्यात काँग्रेस सदस्य नाना पटोले यांच्यावर एका दिवसाची निलंबनाची कारवाई करण्यात आली. पण त्यानंतर सभागृहात उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकाऱ्यांना पकडून सभागृहात आणण्याची मागणी करण्यासंबंधीचा एक वेगळाच

प्रसंग घडला. सत्ताधारी पक्षाच्या ज्येष्ठ सदस्य सुधीर मुनगंटीवर यांनी स्वतः ही मागणी केली. त्यामुळे तालिका अध्यक्षांनाही यासंबंधी शासनाला योग्य ते निर्देश द्यावे लागले.

काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांना काल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दिवसभरासाठी निलंबित केले. त्यावर आमदार रोहित पवार यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सोशल मीडियात पोस्ट करून म्हटले आहे की, शेतकऱ्यांची थट्टा करणाऱ्या बबन लोणीकरांनी माफी मागावी म्हणून विधानसभेत आवाज उठवणाऱ्या नानाभाऊ पटोले यांनाच निलंबित करण्याचा निर्णय म्हणजे चोर सोडून संन्याशाला शिक्षा

पान ४

नाना पटोले तर फार दूर होते: आ. आव्हाड

नाना पटोले हे फार लांब उभे होते अध्यक्षांपासून आणि ते एकटेच होते. आम्ही तर झुंड गेलेली पहिली आहे. सत्ताधारी प्लॅन करून नानांना बाहेर घालवणार असतील तर हे आम्हाला मान्य नाही. हे लोकशाहीला न शोभणारे होते. आंदोलन करण्याचे वेगळे प्रकार असतात. आम्ही नाना पटोले यांचे समर्थन करतो.

पटोले अध्यक्षांच्या अंगावर धावून गेले : मुख्यमंत्री

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नाना पटोले यांच्या कृती वरुन काँग्रेसवर निशाणा साधला. सभागृहात आजपर्यंत अनेकदा आपण असे गोंधळ पाहिले आहेत. मात्र, अध्यक्षांचीच चुकी असल्यासारखे पटोले अध्यक्षांच्या अंगावर धावून गेले असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. या सभागृहात असे कधीच झाले नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

नाना पटोले यांना निलंबित केले. विधानभवनात निलंबन होणे, कदाचित कोणी वेडेवाकडे वागले असेल तर निलंबन झाले असेल. पण, पहिल्यांदा असे होत आहे की शेतकऱ्यांचा आवाज उठवण्यासाठी, शेतकऱ्यांचा आपमान जो झालेला आहे, त्याच्याविरोधात आवाज उठवण्यासाठी कोणीतरी निलंबित झाले आहे. हा एक भयानक पायंडा पाडलेला आहे.

– आदित्य ठाकरे, आमदार

संमिश्र

फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट

जनता आवाज वृत्तसेवा

चेन्नई : तामिळनाडूतील शिवकाशी येथील एका फटाक्याच्या कारखान्यात मंगळवारी मोठा स्फोट झाला, वृत्तसंस्था पीटीआयनुसार, या अपघातात किमान ५ जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात ४ जण गंभीर भाजले आहेत. आणखी काही लोक अडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. बचावकार्य सुरू आहे. जखमींना उपचारासाठी विरुधुनगर सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विरुधुनगर जिल्ह्याचे एसपी कन्नन यांनी सांगितले की, शिवकाशीजवळील चिन्नकमानपट्टी गावात एका फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाला. अपघातानंतर कारखान्यातून सतत धूर निघताना दिसत होता आणि आतून फटाके फुटण्याचे आवाज ऐकू येत होते. घटनेची चौकशी सुरू आहे.

केंद्रात सत्तेत आलो तर आरएसएसला बॅन करणार– प्रियांक खरगे

जनता आवाज वृत्तसेवा

बंगळुरू : काँग्रेस नेते प्रियांक खरगे यांनी सोमवारी माध्यमांशी बोलताना म्हटले की, जर केंद्रात काँग्रेसचे सरकार स्थापन झाले, तर आरएसएसवर बंदी घातली जाईल. प्रियांक यांनी आरएसएसवर धर्मनिरपेक्षता आणि समाजवादाच्या विरोधात काम करण्याचा आरोपही केला. ते म्हणाले, काँग्रेसने यापूर्वी दोनदा आरएसएसवर बंदी घातली होती आणि आता त्यांना ती उठवल्याबद्दल पश्चात्ताप होत आहे. त्यांच्या मते, संघ नेहमीच समानता आणि आर्थिक न्यायाच्या विरोधात राहिला आहे. प्रियांक खरगे हे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे पुत्र आहेत आणि सध्या ते कर्नाटक सरकारमध्ये मंत्री आहेत.

राजस्थानच्या अलवरमध्ये रस्ते बुडाले

जनता आवाज वृत्तसेवा

नवी दिल्ली : देशाच्या बहुतेक भागात मान्सूनचा पाऊस सुरूच आहे. सोमवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे राजस्थानातील अलवर येथील रस्ते दोन फूटांपर्यंत पाण्याने भरले होते. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील गंगा-यमुनेत पूरसदृश परिस्थिती आहे. घाटाच्या दिशेने ५०० मीटरपर्यंत पाणी भरले आहे. हिमाचल प्रदेशातील मंडी येथे सोमवारी रात्री ४ ठिकाणी ढगफुटी झाल्याने मोठे नुकसान झाले आहे. पूर आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला आहे, १६ जण बेपत्ता आहेत. १० घरांचे नुकसान झाले आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेची विक्रमी वसुली

३९५१८ मालमत्ताधारकांकडून २७ कोटी वसुल; आयुक्त डांगेंनी मानले करदात्यांचे आभार

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : महानगरपालिकेने एप्रिल ते जून या सर्वसाधारण करावरील सवलत कालावधीत या वर्षी विक्रमी २७ कोटींची वसुली केली आहे. ३९५१८ मालमत्ताधारकांनी या सवलतीचा लाभ घेऊन कराचा भरणा केला आहे. नियमित कर भरून शहराच्या विकासात हातभार लावणाऱ्या करदात्यांचे महानगरपालिकेकडून आभार व्यक्त करण्यात आले आहेत. तसेच, १ जुलैपासून म्हणजेच आजपासून मालमत्ता करावर २ टक्के दंड म्हणजेच शास्ती आकारणी सुरू करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

महानगरपालिकेने एप्रिल व मे महिन्यात संकलित करावर १० टक्के सवलत दिली होती. २३४७८ नागरिकांनी व मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेऊन कर भरला. त्यानंतर जून महिन्यात १६०४० मालमत्ताधारकांनी ८ टक्के सवलतीचा लाभ घेऊन कर जमा केला.

या सर्व मालमत्ताधारकांनी जमा केलेल्या २८.१३ कोटींमध्ये ८६.३२ लाखांची सवलत देण्यात आली असून, २७.२७ कोटी रुपयांचा

पान ४

थकबाकीदारांवर कारवाई सुरूच : डांगे

ज्या मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केलेला नाही त्यांच्यावर दरमहा २ टक्के शास्ती आकारणी सुरू करण्यात आली आहे. अधिकचा दंड टाळण्यासाठी मालमत्ताधारकांनी तत्काळ कराचा भरणा करावा. लवकरच मोठ्या थकबाकीदारांवर महानगरपालिकेकडून कारवाई सुरू करण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

विवेक कोल्हेंकडून मुख्यमंत्री फडणवीसांचे आभार

कोल्हेंच्या मागणीनंतर शासनाकडून ५० टक्के युरिया बफर स्टॉक रिलीज

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : खरीप हंगाम सुरू होताच कोपरगाव तालुक्यासह राज्यभरातील शेतकरी बांधवांनी पेरण्यांना सुरुवात केली आहे. मात्र, याच निर्णायक टप्प्यावर युरिया खताचा तुटवडा जाणवत होता. वेळेवर खत न मिळाल्यास पिकांची वाढ आणि उत्पादन यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता होती. ही बाब ओळखून कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेक कोल्हे यांनी शासनाकडे युरिया बफर स्टॉकपैकी किमान ५० टक्के स्टॉक तत्काळ रिलीज करण्याची ठाम मागणी केली होती.

या मागणीला शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, आता युरिया बफर स्टॉकपैकी ५० टक्के स्टॉक वितरीत करण्यास अधिकृत मंजुरी मिळाली आहे. यामुळे शेतकरी बांधवांना वेळेवर खत मिळून खरीप पिकांची योग्य वाढ सुनिश्चित होणार आहे.

तालुक्यातील अनेक शेतकरी युरिया टंचाईमुळे चिंतित होते, मात्र कोल्हे यांच्या वेळेवरच्या पाठपुराव्यामुळे ही समस्या दूर झाली आहे.

या निर्णयाबद्दल कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शासनाचे मन:पूर्वक आभार मानले आहेत. शेतकऱ्यांचे हित हेच माझे प्रमुख उद्दिष्ट असून, वेळेवर खत उपलब्ध होणे हे पेरणीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

पान ४

प्रदेशाध्यक्ष चव्हाणांच्या नेतृत्वांत राज्यात भाजपा मोठे यश मिळवेल : मंत्री विखे पाटील

जनता आवाज वृत्तसेवा

शिर्डी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विकासित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राज्यात भारतीय जनता पक्ष अधिक मजबूतीने काम करून मोठे यश मिळवेल, असा विश्वास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य करीत असलेल्या विकासात्मक वाटचालीला संघटनेच्या माध्यमातून भक्कम असे पाठबळ उभे करून आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतही विधानसभे प्रमाणेच भारतीय जनता पक्ष प्रथम स्थानावर यश मिळवेल.

– राधाकृष्ण विखे पाटील, जलसंधारण मंत्री

भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावर आ. रविंद्र चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी अभिनंदन करुन, शुभेच्छा दिल्या आहेत. आ. चव्हाण यांच्या माध्यमातून संघटनात्मक अनुभव

पान ४

जिल्ह्याच्या जलजीवन तक्रारींबाबत तारांकित प्रश्न

तब्बल सहा आमदारांनी विधानसभेत उपस्थित केला प्रश्न; आता कारवाईकडे लागल्या नजरा

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्ह्यात प्रत्येक हर घर जल या केंद्र सरकारच्या महत्वकांशी असणाऱ्या जलजीवन योजनेबाबत आधीच ढिगभग तक्रारी असतांना सुमारे ७०० कोटी रुपयांचे बिले अदा करण्यात आलेली असतांना प्रत्यक्षात किती गावात जलजीवन योजना कार्यान्वित झाल्या, किती गावे टँकरमुक्त झाली, याचा तालुकानिहाय वस्तुनिष्ठ खुलासा पाणी पुरवठा विभाग परिषदेने राबवलेल्या योजनेवर संशय व्यक्त केला आहे. यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी याबाबत काय भूमिका घेणार? याकडे नगरसह आता राज्याचे लक्ष लागले आहे.

सोमवारपासून सुरू झालेल्या राज्याच्या पावसाळी अधिवेशात देखील नगर जिल्ह्यातील जलजीवन योजनेबाबत आणि पाणी पुरवठा विभागाबाबत सहा आमदारांनी प्रश्न संशय

पान ४

जलजीवनच्या यश-अपयशाचा होणार खुलासा?

नगर जिल्ह्यातील जलजीवन योजनेबाबत राज्याच्या विधानसभेत काय चर्चा होणार? जिल्हा परिषद प्रशासन आणि पाणी पुरवठा विभाग जलजीवन योजनेतील फुगवटा, योजनेचे यश-अपयश याबाबत काय खुलासा करणार? याकडे राज्याचे लक्ष राहणार आहे.

आता पावसाळी अधिवेशनात देखील सहा आमदारांनी जिल्हा परिषदेचा पाणी विभाग आणि जलजीवन योजनेबाबत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करत जिल्हा

नगर जिल्ह्यात गेल्या तीन वर्षापासून सुमारे १ हजार ४०० कोटी रुपये खर्च करून जलजीवन योजना राबवण्यात आली. या योजनेत आतापर्यंत

तक्रारी कमी होण्याऐवजी वाढल्या?

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह पाणी पुरवठा मंत्र्यांपर्यंत या योजनेबाबत तक्रारीचा ओघ असतांनाही योजना राबवणारे यांची साधी चौकशी झालेली नाही. या योजनेची दरवर्षी केंद्राच्या पथकाकडून चौकशी झालेली असताना योजनेबाबतच्या तक्रारी कमी होण्याऐवजी वाढतांना दिसत आहेत.

... तरीही मी शरद पवारांबरोबरच : प्राजक्त तनपुरे

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : सध्या सत्तेबरोबर जाण्याचा राज्यभर ट्रेन्ड आहे. मी मात्र शेतकऱ्यांसाठी आयुष्यभर ज्यांनी काम केले. त्या शरद पवार यांच्याबरोबरच आहे आणि राहणार आहे. माझा हा निर्णय प्रवाहाच्या विरोधात असला तरी आपल्या मनाला जे पटतं ते आपण करतो. माझे काका अरूण तनपुरे यांच्या ताब्यात सभासदांनी तनपुरे कारखाना दिल्याने कारखाना सुरू करण्याच्यादृष्टीने ते अजित पवार यांच्या पक्षात गेले असावेत, असे स्पष्ट प्रतिक्रिया माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी दिली आहे.

तनपुरे यांचे अनेक कार्यकर्ते तसेच कारखान्याचे संचालक, अनेक माजी नगरसेवक हे काल मुंबईत अजितदादांच्या गटात प्रवेशासाठी गेल्याचे वृत्त राहुरीत पसरल्यानंतर याची चर्चा सुरू झाली. लवकरच प्राजक्त तनपुरे हेही अजितदादा पवार यांच्या गटात जाणार, असेही बोलले जाऊ लागले.

याबाबत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे म्हणाले की, तनपुरे कारखान्याच्या निवडणुकीत अरूण तनपुरे यांच्या पॅनेलला सभासदांनी निवडून दिले.

त्यांच्यावर विश्वास दाखवला. त्यामुळे आता बंद पडलेला हा तनपुरे कारखाना सुरू करण्याची जबाबदारी अरूण तनपुरे यांच्यावर आलेली आहे.

सद्या राज्यात असणारे सरकार पाहता विरोधी पक्षातील लोकांना हे सरकार मदत करत नाही. त्यामुळे जर तनपुरे कारखाना सुरू करायचा असेल तर सरकारच्या मदतीची नितांत गरज आहे. त्यातच सहकार खाते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहे. त्यामुळे अरूण तनपुरे यांनी अजितदादा पवार यांच्या गटात जाण्याचा निर्णय घेतला असावा, असे वाटते. त्यामुळे त्यांचे कार्यकर्ते, संचालक हे त्यांच्याबरोबर पक्षात जाणे साहजिक आहे. आपले कार्यकर्ते त्यांच्याबरोबर गेले असे म्हणता येणार नाही. काही चार-पाच माजी नगरसेवक हे त्यांच्याबरोबर गेल्याचे समजते. मात्र, बाकीचे माजी नगरसेवक व कार्यकर्ते आपल्याबरोबरच आहे.

शरद पवारांचे मोठे व्हिजन : तनपुरे

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी शेतकऱ्यांसाठी मोठे काम केलेले आहे. अगदी एआयचे तंत्रज्ञान जे मेट्रोसिटीमध्ये चर्चिले जायचे. ते ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत आणण्याचे काम शरद पवार यांनी केलेले आहे. शहरामध्ये जे औद्योगिकरण दिसते, जे आयटी सेंटर दिसतात. हे शरद पवार यांचे व्हिजन असल्याचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे म्हणाले.

मुख्यमंत्री राहिलेले शरद पवार यांना शेतीतील खाचखळगा माहीत आहे. पवार साहेब हा एक विचार आहे. हा विचार असा एकदम बाजूला करणे शक्य नाही. शिवाय मी एक साधा नगराध्यक्ष होतो. लोकांनी मला आमदार केल्यावर शरद पवार यांच्यामुळे मी पहिल्याच टर्मला नामदार झालो. त्या माध्यमातून मतदारसंघात मोठी कामे करता आली. ते मी कसे विसरू शकतो? त्यामुळे मी शरद पवार यांच्याच पक्षात राहणार आहे.

– प्राजक्त तनपुरे, माजी मंत्री

'शंभूसूर्य' संस्था नवचैतन्याचे केंद्र : बाफना

जनता आवाज वृत्तसेवा

जामखेड : जामखेडच्या श्री शंभू सूर्य मर्दानी खेळ योग व मल्लखांब प्रशिक्षण संस्थेने परंपरेचे जतन करत नव्या पिढीला आधुनिकतेच्या प्रवाहात घडवले असून, देशपातळीवर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. संस्थेचे मार्गदर्शक संतोष टेकाळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नातून उभी राहिलेल्या या संस्थेत ५ ते २० वयोगटातील मुले व मुली सातत्याने प्रशिक्षण घेत आहेत.

दि. २८ जून २०२५ रोजी सायंकाळी संस्थेच्या प्रांगणात हनुमान आरती व मल्लखांब प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या आदर्श फाउंडेशनचे अध्यक्ष व युवा नेते आकाश बाफना यांनी

मुंबई, पुणेच नव्हे तर देशभरात ही मुले विविध स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करत आहेत. ही संस्था केवळ शारीरिक तंदुरुस्तीच नव्हे तर मानसिक शिस्त आणि परंपरेची जपणूक करणारे कार्य करीत आहे. मोबाईलच्या आहारी गेलेल्या पिढीसाठी ही संस्था म्हणजे नवचैतन्याचे केंद्र आहे.

– आकाश बाफना, अध्यक्ष

विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक करत संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी चित्तथरारक मल्लखांबाचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.यावेळी संस्थेच्या वतीने आकाश बाफना यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्य प्रशिक्षक बबलु टेकाळे, उपाध्यक्ष राजेंद्र भांबे, सचिव अमोल निमोणकर, संजय वारे, रविराज क्षिरसागर, रोनित खुपसे, गणेश माने, बबलु राऊत, माऊली शिंदे आदी उपस्थित होते.

शाळेसंदर्भातील तक्रारीचे निवारण करा

मा. खा. प्रसाद तनपूरे यांनी बैठक बोलावून अधिकाऱ्यांना केल्या सूचना

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : राहुरी स्टेशन गावठाण येथील नगरपालिका शाळा नंबर पाचच्या दुरावस्थेबाबत शिवसेनेचे अशोकराव तनपुरे व तांदुळवाडी ग्रामपंचायत सदस्य निसारभाई सय्यद यांनी तक्रार केली होती. याबाबत माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी नगरपालिका अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळाचे अधिकारी, गटशिक्षणाधिकारी मोहनीराज तुंबारे, माजी शिक्षण मंडळाचे सभापती संजय कुलकर्णी व शाळेचे मुख्याध्यापकांची संयुक्त बैठक घेऊन शाळेसंदर्भातील तक्रारीचे निवारण करण्याविषयीच्या सूचना केलेल्या आहेत.

नगरपालिका शाळा नंबर ५ ला कंपाऊंड नाही, मुलांसाठी शौचालय, मुतारी नाही, इमारतीसह पडवीतील फरश्या खचल्या आहेत. स्टेज नादुरुस्त झालेले आहे. पावसाळ्यात शाळेसमोर गुडघाभर पाण्याचे तळे साचते, यामुळे मुलांना जीव मुठीत घरून शिक्षण घ्यावे लागत आहे. कंपाऊंड नसल्यामुळे शाळेत जनावरे मोकाट फिरतात, रात्रीच्या वेळी बाहेरील काही महाभाग शाळेच्या पडवीत बसून नशा पाणी करतात आदि तक्रारी या बैठकीत करण्यात आल्या.

वास्तविक या शाळेतील मुले तांदुळवाडी ग्रामपंचायत हद्दीतील मतदारांचे ते मुले असून ह्या गोष्टींकडे जसे पालिकेचे कर्तव्य आहे. तसे तांदुळवाडी ग्रामपंचायतीचे ही कर्तव्य आहे. त्यांनीही शाळेच्या विकासकामात योगदान दिले पाहिजे.

माजी खासदार तनपुरे यांनी ग्रामविकास अधिकारी संजय भिंगारदे यांना कंपाऊंडचे प्रस्ताव करण्यास सांगून पालिका व ग्रामपंचायतीने शाळा परिसरात मुरूम टाकण्यास सांगितले आहे. रात्रीच्या वेळी शाळेत नशा पाणी करणाऱ्यांचाही बंदोबस्त करण्यासाठी पोलीस प्रशासनाला सूचना करण्यात आल्या. नगरपालिकेचे बांधकाम विभागाचे अभियंता पराग दराडे, सहाय्यक बाबा गुंजाळ यांनी शाळेत जाऊन सर्वत्र पाहणी करून अहवाल प्रशासनाला दिला आहे.

गावठाण शाळेस संरक्षक भीत बांधून देण्यासाठी लक्ष घालण्याच्या सूचना माजी सरपंच व डॉ. तनपुरे कारखान्याचे संचालक ड. तान्हाजीराव धसाळ यांना फोन करून सांगितले.

विविध विभागातील अधिकारी चर्चेत सहभागी

नगरपालिका शिक्षण मंडळाचे माजी सभापती संजय कुलकर्णी, गटशिक्षणाधिकारी मोहनीराज तुंबारे, नगरपालिका शिक्षण मंडळाचे अधीक्षक सय्यद, शाळेचे मुख्याध्यापक सतीश धोत्रे, अशोकराव तनपुरे, सय्यद निसारभाई आदींनी चर्चेत भाग घेतला.

नगरपालिका अधिकाऱ्यांना सर्व परिस्थिती बघून पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले. शाळा नगरपालिकेची व हद्द तांदुळवाडी ग्रामपंचायतची असल्याने या शाळेकडे नगरपालिका ही लक्ष देत नाही व ग्रामपंचायतही लक्ष देत नसल्याचे सांगण्यात आले. त्याकडे दुर्लक्ष न करता शाळेच्या विकासासाठी काम करा.

– प्रसाद तनपुरे, माजी खासदार

बच्चू कडूंमुळे दिव्यांगांच्या मानधन वाढ : तनपुरे

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : बच्चू कडू यांच्यामुळे राज्य सरकारला दिव्यांगांना मानधन वाढवून द्यावे लागले, हा प्रहार संघटनेचा विजय आहे, असे प्रतिपादन पक्षाशी कर्जत तालुका कार्याध्यक्ष दत्तात्रय तनपुरे यांनी पत्रकार परिषदेमध्ये माहिती दिली.

प्रहार संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना तनपुरे पुढे म्हणाले की, राज्यातील सरकारकडून दिव्यांग व्यक्तींवर मोठ्या प्रमाणामध्ये अन्याय करण्यात येत आहे. राज्य सरकारकडे दिव्यांग व्यक्तींना दरमहा सहा हजार रुपये मानधन मिळावे, यासाठी माजी मंत्री व प्रहार

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांनी अमरन उपोषण केले होते. त्याला यश आले असून दिव्यांगाना आता चार हजार रुपये मानधन देण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे.

यापुढील काळात शिवशाही एसटी बसमध्ये दिव्यांगांना प्रवास करू दिला नाही, तर आंदोलन संपूर्ण जिल्ह्यामध्ये उभा करू, असा इशारा देखील यावेळी तनपुरे यांनी दिला. त्यांनी दिव्यांगांना वेळेवर मानधन देण्यात यावे, अशी मागणी केली.

कर्जत येथील आंदोलनामध्ये शब्बीर पठाण, शशिकांत पाटील, शहराध्यक्ष शेरखान पठाण, भुजबळ महाराज, मुका पेंटर, पप्पू तनपुरे, बबन आढागळे, माणिक आढागळे, शशिकला आढागळे, नवनाथ खेडकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

वाहतूक नियंत्रण यांना विचारला जाब

प्रहार संघटना, वृद्ध भूमी हीन संघटना यांच्या वतीने कर्जत तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी एसटी महामंडळाच्या शिवशाही एसटी बसमध्ये दिव्यांग व्यक्तींना प्रवेश दिला जात नाही. याबद्दल एसटी महामंडळाची श्रीगोंदा आगार व्यवस्थापक व कर्जत येथील वाहतूक नियंत्रण यांना जाब विचारला होता.

सहकार पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करा

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील निर्देशानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सहकार पुरस्कारासाठी पात्र सहकारी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. या संदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर मंगेश सुरवसे व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर रवि गडेकर यांनी आवाहन केले आहे की, श्रीरामपूर तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांनी आपले प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक निबंधक कार्यालयात दि. १८ जुलै २०२५ पर्यंत सादर करावे.

बाबासाहेब शेकडेंची धर्मादाय विभागात निष्कलंक सेवा : गीते

जनता आवाज वृत्तसेवा

जामखेड : बाबासाहेब शेकडे यांच्या अनुभवाचा फायदा आम्हा सर्वांना झाला. आमच्यापैकी ते पहिले अधिकारी. मी ज्या वेळेला एमपीएससी परीक्षा पास झालो. त्यावेळी मुलाखत देताना मला शेकडे यांनी विशेष मार्गदर्शन केले व मी अधिकारी झालो. आजही मी त्यांच्या तत्वावर चालण्याचा प्रयत्न करतो, असे प्रतिपादन अहिल्यानगरचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गीते यांनी केले.

धर्मादाय उप आयुक्त कार्यालय अहिल्यानगरचे अधीक्षक बाबासाहेब शेकडे सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने त्यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिकचे धर्मदाय सह आयुक्त एम. एल. जोगी होते. अहिल्यानगरचे धर्मदाय उप आयुक्त एन. व्ही. जगताप, छत्रपती संभाजीनगरच्या धर्मदाय उपायुक्त उषा पाटील, बीड जिल्हा शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, निवासी

शेकडे यांनी ३२ वर्ष धर्मदाय आयुक्त कार्यालयात सेवा केली. मुंबई पुणे नाशिक अहिल्यानगर बीड या विविध ठिकाणी सेवा करत असताना त्यांनी संपूर्ण आयुष्यात कसलाही डाग लागू दिला नाही. ते निष्कलंक राहिले त्यामुळे इतक्या वर्षांमध्ये त्यांच्यावर कसलीही कारवाई झाली नाही त्यांच्या अनुभवाचा आमच्यासारख्या अधिकाऱ्यांना कायम फायदाच झाला. पुणे येथे असताना त्यांच्याकडे धर्मादायचा वैद्यकीय विभाग होता त्या काळात त्यांनी असंख्य गरजू व्यक्तींची योग्य सेवा केली.

– एन. व्ही. जगताप, धर्मदाय उप आयुक्त

उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, आकोला जिल्ह्याचे वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश विनोद डोंगरे आदी उपस्थित होते. यावेळी धर्मदाय उप आयुक्त कार्यालय अहिल्यानगरचे अधीक्षक बाबासाहेब हिराजी शेकडे व त्यांच्या पत्नी संगीता बाबासाहेब शेकडे यांचा सर्व मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. तत्पूर्वी या निमित्ताने शेकडे यांच्या आई-वडिलांच्या विशेष प्रतिमांचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, दिवाणी न्यायाधीश विनोद डोंगरे, सोपानराव शेकडे यांची भाषणे झाली. यावेळी अहिल्यानगर धर्मादाय वकील संघटना, बीड धर्मादाय अधिकारी कार्यालय वकील संघटनेच्या वतीने तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शेकडे यांचा सपत्नीक सत्कार केला.

जीवनात गमावलेले आरोग्य पुन्हा मिळत नाही

प्रल्हाद गिते; अनामप्रेम व भीमा गौतमी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : सामाजिक क्षेत्रात योगदान देवून आरोग्य व पर्यावरण चळवळ चालविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात मागील २५ वर्षात ग्रुपच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेणाऱ्या हरदिनच्या रौप्य महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तर स्नेहालय संचलित अनामप्रेम व भीमा गौतमी विद्यार्थिनी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅगसह शैक्षणिक किटचे वाटप करुन गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या स्नेह मेळाव्याप्रसंगी सीए रवींद्र कटारिया, महेश पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर, संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, उद्योजक लॉरेन्स स्वामी, सीडी देशमुख लॉ कॉलेजचे सचिव नारायणराव साठे, रामभाऊ बिडवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

जीवनातील सर्व काही गमावलेले पुन्हा मिळवता येते. मात्र गमावलेले आरोग्य पुन्हा परत मिळत नाही. शरीर ही खरी धनसंपदा असून, ते जपण्यासाठी समाजात हरदिनच्या माध्यमातून सुरु असलेली जागृती प्रेरणादायी आहे. व्यायामाने निरोगी राहून आनंदी जीवन जगता येत आहे.

– प्रल्हाद गीते, सहाय्यक पोलीस निरीक्षक

संजय सपकाळ म्हणाले की, शरीराचे व पर्यावरणाच्या आरोग्यासाठी योग आणि वृक्षरोपण काळाची गरज बनली आहे. मागील पंचवीस वर्षापासून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून आरोग्य चळवळ चालविण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी प्रांजली सपकाळ, वंदना मेहेत्रे, उषाताई ठोकळ, लताबाई सपकाळ, यशोदा झावरे, दिपाली सपकाळ, संगीता दरवडे, सुरेखा आमले, सुप्रिया सपकाळ, रजनी जाधव, शितल सपकाळ, विजय वाळुंजकर, मीरा मुळे, आशा पराते, राजश्री राहिंज, आदिती मेहेत्रे, कल्याणी धाडगे, आराध्या परदेशी, माया दरवडे, सुधा जावळे, रूपाली खुरपे, सुनीता खोत, सिद्धी खुरपे, ज्योती परदेशी, श्रुती खोत, ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष विठ्ठलराव लोखंडे, सुभाषराव होडगे, प्रमोद मुळे, सुनील कर्डिले, रावसाहेब झावरे यांनी परिश्रम घेतले.

टाकळीभानमध्ये वारकऱ्यांना ९०० रेनकोटचे वाटप

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपुर : श्री संत तुळशीराम महाराज पायी दिंडी मुठेवाडगाव तसेच कारेगाव, टाकळीभान येथील पायी दिंडीचे भाविक भक्त पंढरपूरकडे जात असताना मिरजगाव येथे ९०० भाविकांना रेनकोटचे वाटप करण्यात आले.

श्रीरामपूर पंचायत समितीचे माजी सभापती दीपक पटारे, पुणे

येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते अविनाशजी कुलकर्णी, श्रीरामपूर मार्केट कमिटीचे संचालक गिरधर आसने व भाजपचे तालुका सरचिटणीस डॉ. शंकरराव मुठे यांच्या वतीने मानव सेवा हीच ईश्वर सेवा समजून रेनकोटचे वाटप करण्यात आले. तर अनेक दिंड्यांना सदिच्छा भेटी देण्यात आल्या. यावेळी श्रीराम संघाचे रामेश्वर मुठे, मारुती जासूद, प्रदीप मुठे, जालिंदर मुठे, साईनाथ मुठे, ओम मुठे, वेदांत मुठे यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

सारडा विद्यालयातील मुख्याध्यापकांना निलंबित करा

पदाधिकाऱ्यांची माध्यमिक शिक्षण विभागाकडे मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : शालेय विध्यार्थ्याच्या खून प्रकरणी हिंद सेवा मंडळ संचलित सीताराम सारडा विद्यालयातील मुख्याध्यापकांना निलंबित करून या विद्यालयातील शिक्षक व इतर कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने माध्यमिक शिक्षण विभागाला निवेदन देताना रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, महेश भोसले, जिल्हा उपाध्यक्ष विकास रणदिवे, संजय ताकवाले, शहर उपाध्यक्ष विवेक विधाते आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, १८ जून रोजी शाळेच्या वेळेत दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास सर्जेपुरा भागातील दोन विद्यार्थ्यांमध्ये पूर्वीच्या किरकोळ वादातून भांडण झाले, त्या वादाचे पुनर्वसन म्हणजे आठवीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने दहावी च्या वर्गात शिकणाऱ्या विदयार्थ्याच्या पोटावर, छातीवर चाकूने वार करून खून केला. ही बाब निश्चितच हदरवून सोडणारी आहे.

शाळेच्या आवारात अशी घटना घडली कशी? तसेच विदयार्थ्याकडे चाकू आला कसा? शाळेत सुरक्षा रक्षक आहेत की नाहीत? शिक्षकांचा विदयार्थ्यांवर अंकुश आहे की नाही? शाळेच्या आवारात खून होत असून या घटनेची जबाबदारी संस्था व शालेय व्यव स्थापनाची नाही का? असे प्रश्न निवेदनातून उपस्थित केले आहेत.या खून प्रकरणी शाळेच्या मुख्याध्यापकाचे त्वरित निलंबन करून सर्व शिक्षक व इतर कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा लवकरात लवकर कारवाई न झाल्यास माध्यमिक शिक्षण विभागच्या दालनात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रिपब्लिकन सेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

पक्षांसह कार्यकर्त्यांनी नियमांचे काटेकोर पालन करा

प्रांताधिकारी किरण सावंत : पाटील; श्रीरामपुरात राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत पाटील यांनी नुकतीच तालुक्यातील राजकीय पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

या बैठकीत निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीसाठी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, निवासी नायब तहसीलदार राजेश पऊळ, निवडणूक नायब तहसीलदार हेमलता वाकडे, उपमुख्याधिकारी महेंद्र तापकिरे, महसूल सहायक उत्तम रासकर, ओम खुपसे, संदीप पाळंदे, नगरपरिषदेचे लिपिक अरुण

लांडे उपस्थित होते.

यावेळी निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा पाया आहे. सर्व पक्षांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी नियमांचे काटेकोर पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण आणि निष्पक्षपणे पार पाडावी असे सावंत-पाटील यांनी सांगितले. त्यांनी मतदान केंद्रांवर गोंधळ टाळण्यासाठी आणि मतदारांना त्रास होऊ नये यासाठी पक्षांनी 'बूथ लेवल एजंट'ची नेमणूक करावी असे आवाहन केले.

१ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै व १ ऑक्टोबर २०२४ या तारखेस १८ वय वर्ष पुर्ण होणारे व झालेल्या व्यक्तींना मतदार नोंदणी करता येणार आहे. प्रतिष्ठीत मतदार, आजी माजी खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती, सदस्य, ग्रामपंचायत सरपंच, वकील, इंजिनियर, दिव्यांग आदी मतदारांची नावे मतदार यादीत तपासा. याकामी काही अडचण असल्यास तत्काळ निवडणूक शाखेत संपर्क साधण्याचे आवाहन प्रांताधिकारी किरण सावंत-पाटील यांनी केले.

प्रांत व तहसीलदारांचे कौतुक

लोकसभा व विधानसभा निवडणुका प्रांताधिकारी किरण सावंत-पाटील व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ या राम-लक्ष्मण जोडीच्या कुशल नेतृत्वाखाली निवडणूक यंत्रणेने उत्तम काम केल्यामुळे चांगल्या प्रकारे पार पडले. यावेळी कोणतीही तक्रार अथवा अडचण आली नाही. श्रीरामपूर मतदारसंघात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही असे गौरव उद्गार राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी काढले.

निवडणूक प्रक्रिया ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नाही, तर राष्ट्रीय कर्तव्य आहे. सर्वांनी एकत्र येऊन ही प्रक्रिया यशस्वी करूया. मागील लोकसभा व विधानसभा निवडणुकांचा अनुभव आणि प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यशस्वी पार पाडू.

– मिलिंदकुमार वाघ, तहसीलदार

या बैठकीला काँग्रेस, बहुजन समाज पक्ष, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि इतर स्थानिक पक्ष व आघाडीचेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत पक्षांनी निवडणूक प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. काही पक्षांनी मतदार यादीतील त्रुटींवर प्रश्न उपस्थित केले, ज्यावर प्रांताधिकारी यांनी तात्काळ कार्यवाहीचे आश्वासन दिले.

पाथर्डीतील विद्यार्थ्यांना नवीन पुस्तकांची प्रतीक्षा

शाळा सुरू होवून पंधरा दिवस उलटूनही पुस्तके मिळेना

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : शिक्षण विभागाच्या गलथान कारभारामुळे अनेक विद्यार्थ्यांना अजूनही पुस्तके नाहीत. पाथर्डी तालुक्यातील इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना हिंदी विषयाची, तर तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना परिसर अभ्यास या विषयाची पुस्तके अद्याप मिळालेली नाहीत. शाळा सुरू होऊन पंधरा दिवस उलटले तरी पुस्तकांचा तुटवडा कायम आहे, यामुळे शिक्षकांना अध्यापनात अडचणी येत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

राज्यात हिंदी विषय सक्तीचा करण्याच्या हालचाली सुरू असताना, पाथर्डी तालुक्यात हिंदी विषयाची पुस्तके उपलब्ध नसणे ही बाब गंभीर आहे. तालुक्यासाठी आवश्यक असलेल्या पुस्तकांपैकी केवळ ७८ टक्के पुस्तके उपलब्ध झाली आहेत, तर उर्वरित पुस्तके अद्यापही शाळांपर्यंत पोहोचलेली नाहीत. यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. शिक्षकांना वर्गात काय शिकवायचे, आणि विद्यार्थ्यांनी काय अभ्यास करायचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पुस्तकांअभावी शिक्षकांना अध्यापन करणे कठीण झाले आहे. एका शिक्षकाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, ''आमच्याकडे शिक्षक म्हणून जबाबदारी आहे, पण पुस्तकेच नसतील तर काय आणि कसे शिकवायचे? विद्यार्थ्यांच्या शंकांना उत्तर द्यायचे तरी कुठून?'' दुसरीकडे, पालकांमध्येही तीव्र नाराजी आहे. सरकारकडून मोफत पुस्तके दिली जात असल्याने बाजारात ही पुस्तके उपलब्ध नसतात, त्यामुळे पालकांकडे पर्यायच उरत नाही. एका पालकाने संताप व्यक्त करताना म्हटले, ''शासनाने मोफत पुस्तके देण्याचे आश्वासन दिले आहे, पण ती वेळेवर मिळाली नाहीत तर मोफत असून उपयोग काय? आमच्या मुलांचे नुकसान होत आहे.''

पुरस्तके न मिळण्याची हे कारण

पुस्तकांच्या टंचाईचे कारण शिक्षण विभागाच्या नियोजनातील त्रुटी असल्याचे समोर आले आहे. गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते यांनी याबाबत सांगितले की, पुस्तक वाटपाची जबाबदारी विस्तार अधिकारी रामनाथ कराड यांच्याकडे आहे. तर, कराड यांनी स्पष्ट केले की, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात पुणे येथील बालभारतीने दिलेल्या लिंकवर पुस्तकांची मागणी नोंदवली जाते. मात्र, यंदा नजरचुकीने हिंदी आणि परिसर अभ्यास विषयाच्या पुस्तकांची मागणी नोंदवली गेली नाही. यामुळे ही पुस्तके तालुक्याला मिळाली नाहीत. आता पुन्हा बालभारतीकडे मागणी करण्यात आली असून, पुस्तके लवकरच उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले.

काळे महाविद्यालयात उच्च अभ्यासक्रमांना मान्यता

जनता आवाज वृत्तसेवा

कोळपेवाडी : कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या अडचणी कायमच्या दूर झाल्या असून कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्यासुशीलामाई काळे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू झाले असल्याची माहिती संस्थेच्या सचिव चैतालीताई काळे यांनी दिली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशातून स्व. सुशीलामाई काळे यांच्या आग्रहखातर माजी खा. कर्मवीर शंकररावजी काळे यांनी कोळपेवाडी येथे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरू केले. मागील जवळपास २५ वर्षापासून या महाविद्यालयाने अनेक विद्यार्थिनींचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण केले असून कित्येक विद्यार्थी-विद्यार्थिनी उच्च पदावर कार्यरत आहेत. कोळपेवाडी परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शहरात जावे लागत होते. ही अडचण ओळखून महाविद्यालय व्यवस्थापनाने कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी आ. अशोकराव काळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला. त्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी केलेल्या मोलाच्या सहकार्यातून सौ. सुशीलामाई काळे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू झाले आहेत.

राहुरी फॅक्टरी परिसरात अवैध दारू विक्री

अवैध व्यवसाय बंद करण्याचा संतप्त महिलांचा इशारा

जनता आवाज वृत्तसेवा

देवळाली प्रवरा : पोलिसांच्या आशिर्वादाने राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथे राजरोसपणे अवैध दारु विक्री केली जाते. कमी वयातील तरुण मुले दारुच्या आहारी जाऊन व्यसनाधिन झाले आहेत. याच दारुमुळे कमी वयातील अनेक तरुण मुले मयत झाले. यापुढील काळात दारुमुळे कोणी मृत्यूमूखी पडला तर त्याची सर्व जबाबदारी राहुरी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यावर राहिल. त्याचा अंत्यविधी राहुरी पोलीस ठाण्याच्या पोलिस निरीक्षकांच्या दालना समोर केला जाईल, असा संतप्त इशारा राहुरी फॅक्टरी येथिल प्रसादनगर भागातील संतप्त महिलांनी दिला आहे.

राहुरी फॅक्टरी प्रसादनगर भागातील काही महिला व पुरुषांनी राहुरीचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना निवेदन देवून अवैध दारु विक्रीमुळे कमी वयातील तरुण मुले व्यसनाच्या आहारी गेले आहेत. अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले आहेत. अविवाहित तरुणांचे व्यसनाच्या अहारी जावून अकाली मृत्यू

झाल्याने आई- वडीलांचा म्हातारपणाचा आधार तुटला आहे. त्यामुळे अवैध दारूविक्री बंद करण्याची मागणी केले. निवेदनावर शरद साळवे, लैला शेख, परवीन शेख, रेखा जाधव, सुनिता पवार, रुथ कांबळे, मंगल थोरात, सविता बनसोडे, रोशन शेख, स्वार्थाबाई जाधव, जैतून भाभी, माया साठे, लता जगताप, अलका पठारे, लता साळवे, येलनबाई गायकवाड, परिगा सरोदे, अंजू बोर्डे, पल्लवी पवार, रंगूबाई मोकळ, लक्ष्मीबाई पंडित, कविता साळवे आदि महिला व पुरुषांच्या सह्या असून निवेदन देण्यासाठी ते उपस्थित होते.

मानव अधिकार हे माणसाला मिळालेली कवचकुंडले

युवराज; पारनेर महाविद्यालयात मानव अधिकार प्रशिक्षण कार्यशाळा

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : मानवाधिकार हे माणसाचे मुलभूत आणि जन्मतः मिळालेले अधिकार असून ते आपल्या अधिकाराचे संरक्षक असून ती आपली कवचकुंडले आहेत, असे विचार राष्ट्रीय मानव अधिकार आयोग नवी दिल्लीचे आयपीएस अधिकारी युवराज यांनी प्रकट केले.

पारनेर महाविद्यालय व राष्ट्रीय मानव अधिकार आयोग नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २ दिवसीय राष्ट्रीय मानव अधिकार प्रशिक्षण कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे

वरिष्ठ प्राध्यापक डॉ. दिलीप ठुबे होते. प्रमुख उपस्थित म्हणून जिल्हा महिला, बाल कल्याण व बाल सुधार समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले, पारनेर पोलिस निरीक्षक समीर बारवकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. रविंद्र देशमुख, शाखा समन्वयक डॉ. दिपक सोनटक्के, शाखा संयोजक डॉ. रघुनाथ नजन हे उपस्थित होते.

युवराज म्हणाले, शिक्षण विषयक मानवाधिकार व स्वातंत्र्य विषयक मानवाधिकाराविषयी सखोलपणे माहिती देऊन राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची भूमिका व कार्याची ओळख करून दिली.

शिबीर यशस्वीतेसाठी यांचे प्रयत्न

दोन दिवसीय मानवाधिकार कार्यशाळेत डॉ. आर. जी. सय्यद, ॲड. वेद आहेर, डॉ. गोकुळ मुंडे, प्रा. वीरेंद्र धनशेट्टी, प्रा. अशोक शिंदे, ॲड. अनुराधा येवले यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयकुमार राऊत यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. शुभदा आर्डे यांनी केले. आभार डॉ. हनुमंत गायकवाड यांनी मानले.

'ज्ञानेश्वरी दिंडीला भविष्यात वैभव लाभेल'

जनता आवाज वृत्तसेवा

नेवासा : ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळा भविष्यात देहू-आळंदीच्या दिंडीप्रमाणेच भव्य आणि वैभवशाली होईल, असा आशिर्वाद जोग महाराज शिक्षण संस्थेचे गुरुवर्य शांतीब्रह्म मारुतीबाबा कुऱ्हेकर यांनी या सोहळ्यास दिला. त्यांनी भक्तिभावाने पालखीचे दर्शन घेतले आणि ज्ञानेश्वरीच्या पादुकांना वंदन करत भाविकांमध्ये भक्तीरस जागवला.

नेवासेतील या दिंडी सोहळ्याचे यंदा ५६ वे वर्ष असून, रामभाऊ महाराज राऊत आणि देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रेरणेतून हा सोहळा अधिक व्यापक झाला आहे. यामध्ये तब्बल २८ दिंड्या सहभागी असून, नव्याने तयार करण्यात आलेल्या भव्य चांदीच्या रथात ज्ञानेश्वरीची पालखी मिरवते आहे. पालखी ज्या ज्या ठिकाणी थांबते, तेथे भाविक मोठ्या भक्तिभावाने तिचे स्वागत करतात.

या सोहळ्याला संपूर्ण महाराष्ट्रातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. नुकतेच अहिल्यानगर येथे निवृत्ती महाराजांच्या पादुकांनी ज्ञानेश्वरीच्या पादुकांना वंदन केले. ही गुरुबंधूंची भेट वारकरी वर्तुळात आणि विविध माध्यमांत चर्चेचा विषय ठरली आहे.

कामगारांचे ढोल बजाव आंदोलन मागे

बोगस बांधकाम कामगारांवर होणार कारवाई

जनता आवाज वृत्तसेवा

नेवासा : आंदोलनात काम गाराच्या प्रश्नात तोडगा निघाला नसल्याने मंगळवारी जिल्हा कामगार कार्यालय अहिल्यानगर येथे दुसऱ्या दिवशीही समर्पणच्या बांधकाम कामगारांचे धरणे आंदोलन व 'ढोल बजाव' आंदोलन सुरूच होते. सायंकाळी कामगारांच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाल्याने दोन दिवसांपासून

नगरला सुरू असलेले काम गारांचे 'ढोल बजाओ' आंदोलन स्थगित करण्यात आले.

बनावट बांधकाम काम गारांचा जो सुळसुळाट जिल्हाभर झालेला आहे, त्याच्या विरोधात ठोस कार्यवाहीच्या लेखी आश्वासनासाठी कामगार मंगळवारीही आग्रही होते. सदर बाबतीत भरारी पथक तातडीने नियुक्त करून ग्रामपंचायत स्तरावर कामगारांची ओळख परेड केली जाईल आणि बनावट आढळलेल्या कामगाराकडून त्याने आजपर्यंत मंडळाकडून लाटेला लाभ परत मिळवला जाईल. त्याची नोंदणी तातडीने जागेवर रद्द करण्यात येईल. असे बोगसकाम करणाऱ्यांवर तसेच बोगसपणा करण्यास प्रवृत्त करणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, अशी ग्वाही सह कामगार आयुक्त रेवन्नाथ भिसले यांनी दिली. त्याचबरोबर लाभ वाटपाच्या कामात सुसूत्रता आणली जाईल.

यांनी केले होते आंदोलन

यावेळी कामगारांच्या वतीने जेष्ठ कामगार डेव्हिड साळवे, दीपक भोंगळ, रंगनाथ डुकरे, कृष्णा डहाळे,किरण चेमटे, अमोल शेरे, पांडुरंग मते, बाबासाहेब टिळेकर, ठेकेदार गायकवाड,राजेंद्र थोरात, मायकल गायकवाड व डॉ करणसिंह घुले यांनी चर्चेत सहभाग घेतला.

आत्मा मालिकचे सीईटी परीक्षेत यश

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट संचलित उत्कृष्ट कामगिरी केली आहे. पार्थ सोमनाथ गोरे यांस ९९.५४ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम, चि. गोडसे तन्मय श्रीराम ९८.९४ टक्के द्वितीय, टोरपे अथर्व सुनील ९७.९२ टक्के तृतीय, आमरे प्रांजल संजय ९७.६४ टक्के चतुर्थ पवार प्रणव सिताराम ९६.३१ टक्के मिळवून पाचवा क्रमांक पटकाविला आहे. तसेच २० विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले आहे.

आत्मा मालिक शैक्षणिक संकुलामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासाच्या दृष्टीने शिक्षणाबरोबर सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती व प्रवेश पात्रता परीक्षांची तयारी करून घेतली जाते. आकाष कोचिंग इन्स्टिट्यूट व आत्मा मालिक ज्युनिअर कॉलेज यांचे संयुक्त विद्यमाने नीट, जेईई व सीईटी प्रवेश पात्रता परीक्षांचे मार्गदर्शन करण्यात येते. यामुळेच गेल्या ६ वर्षात ३५ विद्यार्थ्यांची नीट परीक्षेच्या माध्यमातून एम.बी.बी.एस. साठी निवड झाली आहे. तर ०९ विद्यार्थ्यांची आय.आय.टी. व एन.आय.टी. मध्ये निवड झाली असे विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी यांनी सांगितले. अभ्यासाचे सुक्ष्म नियोजन तसेच वर्ग, वसतिगृह, अभ्यासिका, भोजन या सर्व सुविधा एकाच छत्राखाली असल्याने विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी जास्त वेळ मिळतो. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून चांगली तयारी करून घेता येते. या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना या परीक्षांची तयारी करणे आणखी सोपे व्हावे यासाठी आत्मा मालिकच्या वतीने शैक्षणिक टॅब उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. अशी माहिती शैक्षणिक व्यवस्थापक सुधाकर मलिक यांनी दिली.

टॉपर स्पीड स्केटिंग उत्साहात संपन्न

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : जिल्ह्यातील नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविणारी तसेच जिल्ह्यात गेल्या २५ वर्षा पासुन अधिक वर्षे खेळाडू निर्माण करणाऱ्या अकॅडमी तर्फे सालाबादप्रमाणे यंदाही भव्यदिव्य २५ वी टॉपर्स खुली राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर बुरुडगाव रोड कै. पुंडलिकराव भोसले स्केटिंग रिंक येथे आयोजित करण्यात आल्या होत्या सादर स्पर्धेत राज्यामधील तसेच नगर जिल्ह्यासह, संगमनेर, श्रीरामपूर,

राहुर, श्रीगोंदा, अष्टी, कडा, बिड, संभाजीनगर, सुपा, शिरुर, पुणे, जामखेड , सोलापूर, बार्शी तसेच अकॅडमी, शाळा, जिल्ह्यातील स्केटिंग प्रेमी खेळाडू, पालक, प्रशिक्षक यांनी आपली उपस्थिती लाऊन स्पर्धेला उस्फूर्त प्रतिसाद दिला. अशी माहिती अकॅडमीचे सल्लागार असिफ ईकबाल शेख व अध्यक्ष तथा संस्थापक प्रदीप पाटोळे यांनी दिली. अहिल्यानगर महानगर पालिकेचे माजी उपमहापौर गणेश भोसले यांना सर्व खेळाडूंना स्पर्धे करिता शुभेच्छा दिल्या. सादर स्पर्धेत क्वाड, इनलाईन, रिक्रिएशन इनलाईन, टेनासिटी स्केट प्रकार वय वर्ष ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १४ व खुल्या गटातील खेळाडुंना सुवर्ण, रौप्य, कांस्य पदके प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले अशी माहिती अकॅडमीचे कार्य अध्यक्ष संजय नन्नवरे यांनी दिली. विशेष या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडू कार्तिक नन्नवरे व इतर खेळाडू सोहम शिंदे, वैभव पाटोळे, जय भंडारी, विआन मुथा, ईश्वरी आव्हाड, संस्कार कुलकर्णी, जोना जाधव, आदर्श बिश्वास, प्रणित पोखर्णा आदी खेळाडूंचे अती वेगवान सामने लाक्षणिक ठरले.

जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करा

आ. अमोल खताळ यांनी विधानसभेत लक्षवेधी मांडत केली मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : पुणे- नाशिक महामार्गावरील संगमनेर खुर्द आणि संगमनेर बुद्रुकला जोडणारा ब्रिटिशकालीन पूल आजही वापरात आहे. या पुलासह राज्यातील सर्व जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत केली. संगमनेरातील रखडलेल्या काम ाबाबतही त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.

मुंबई येथे सुरू असलेल्या विधिमंडळ पावसाळी अधिवेशनात आमदार खताळ यांनी हा प्रश्न उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले. जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून किती दिवसांमध्ये पुन र्बांधणी होणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संगमनेरच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणारी रस्त्याची कामे ठरलेल्या वेळेत पूर्ण होत नाहीत. शासननिधी खर्च करायला तयार आहे. पण त्यावर काहीही परिणाम होत नाही त्यामुळे ती कामे वेळेत पूर्ण होत नाहीत, ही बाब लक्षात घेता वेळेमध्ये काम पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी लक्षवेधी सूचना आमदार खताळ यांनी मांडली.

पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत तीन ते चार पर्यटकांचा बळी गेला तर काही जण जखमी झाले. या प्रकरणी दोषी असणा ऱ्यांवर अद्याप कारवाई झाली नाही तसेच या प्रकरणाची चौकशी झाली नाही. याकडे आ. खताळ यांनी विधिमंडळाचे लक्ष वेधले. त्यावर उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी या दुर्घटनेबाबत एक समिती स्थापन केली असल्याचे सांगितले.

निसर्गाच्या सानिध्यात राहण्यासाठी वृक्षारोपण करा

माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांचे नागरिकांना आवाहन

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : शहरातील प्रभाग क्रमांक एक मधील नागरिकांना निसर्गाच्या सानिध्यात राहण्यासाठी महापालिकेच्या ओपन स्पेसमध्ये वृक्षारोपण करून नागरिकांच्या सहकार्यातून संवर्धन करण्याचे काम केले जाईल, वृक्षाच्या माध्यमातून आपल्याला मोफत कृत्रिम ऑक्सिजन मिळत असतो, तसेच परिसर हिरवाईनी नटला जातो, वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन

माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांनी केले

प्रभाग क्रमांक एक गोकुळ नगर मधील ओपन स्पेस जागेमध्ये माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांच्या हस्ते वृक्षारोपण संपन्न झाले. यावेळी विठ्ठल लांडगे, डॉ. सागर बोरुडे, भैय्या चव्हाण, अनिल गांधी, हसन राजे, संग्राम म्हस्के, आशिष गांधी, दत्तात्रय चव्हाण, राजेश बेल्हेकर, योगेश परमाने, सोपान खरमाळे, गणेश बोरुडे, गणेश बारस्कर, लक्ष्मण शिदोरे, राजाराम सोनटक्के, कैलास दुमाने, संजय लांडे, महेश गलांडे, गिरीश जगताप, सुनिता वाल्हेकर अधिक उपस्थित होते.

अनिल गांधी म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांना वृक्षाबद्दल असलेले प्रेम पाहता त्यांनी प्रभागामधील नागरिकांना वृक्षारोपणाचा व संवर्धनाचा एक चांगला संदेश दिला आहे.

वृक्षारोपण व संवर्धन नागरिकांशिवाय यशस्वी होऊ शकत नाही, यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन लोक चळवळ उभे करावी हा एक सामाजिक उपक्रम असून प्रत्येकाच्या जीवनामध्ये याचे महत्त्व मोठे आहे, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाची खरी गरज आहे त्यामुळे मनुष्याचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होत असते. **– डॉ. सागर बोरुडे, माजी नगरसेवक**

कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता, जि. अहिल्यानगर

उपबाजार आवार लोणी खुर्द

भाजीपाला आवक व बाजारभाव क्विंटलमध्ये

शेतमालाचे भाव	किमान दर	कमाल दर	सर्वसाधारण दर
कांदा	२००	१३००	८००
लसूण	५०००	८०००	६५००
टोमॅटो	१०००	१८००	१४००
हिरवी मिरची	१५००	४०००	२७००
शेवगा	१०००	१२०००	११०००
भुईमुग शेंगा	३१००	५०००	४१००
लिंबू	२६००	३५००	३१००

संपादकीय

'वंदे भारत' आणि राष्ट्रउभारणी

काश्मीर खोऱ्याच्या दऱ्या वर्षानुवर्षे केवळ भौगोलिकदृष्ट्याच नव्हे, तर मानसिकदृष्ट्यादेखील देशाच्या इतर भागांपासून तुटलेल्या होत्या. काश्मीरमध्ये रेल्वेसेवेचा विस्तार हा केवळ भौगोलिकच नव्हे, तर सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मानसिक अंतरदेखील भरून काढण्यासाठी केलेला राष्ट्रीय प्रयत्न ठरतो. २०२४ मध्ये भारत सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, जम्मू आणि काश्मीरम धील साठ हजारांहून अधिक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी पंजाब, दिल्ली आणि इतर भागांमध्ये जातात. या विद्यार्थ्यांना अनेकदा हंगामी अडथळे आणि असुरक्षित रस्ते मार्गांचा सामना करावा लागतो. गेल्या काही वर्षांमध्ये तर हवामानामुळे दर वर्षी सरासरी एक महिन्यापेक्षा जास्त काळ रस्ते वाहतूक बंद राहिली. हे बंद महामार्ग विद्यार्थ्यांची उपस्थिती, परीक्षा आणि एकूण शैक्षणिक प्रवाहात व्यत्यय आणतात. सामाजिक असमानतेची पहिली ओळ शाळेच्या दाराशी ओढली जाते. वाहतुकीची समस्या गंभीर असल्यास पालक मुलांना शिक्षणासाठी पाठवण्यास कचरतात. मुलींसाठी शिक्षणाचा संघर्ष आणखी कठीण होतो. हरयाणाच्या नूह जिल्ह्यासारखी उदाहरणे दर्शवतात की शाळेत पोहोचणे कठीण असल्यास पुरुष आणि महिला साक्षरतेतील फरक खूप मोठा होतो. काश्मीरसारख्या दुर्गम भागात हवामान आणि सुरक्षा आव्हानात्मक असल्याने पर्यटन, व्यवसाय आणि इतर सुविधांसह शिक्षणासाठी सुलभ, जलद आणि सुरक्षित रेल्वे प्रवासाची व्यवस्था ही एक महत्त्वाची पायाभूत सुविधा आहे. ती नीट पुरवली गेल्यास कोणत्याही विद्यार्थ्याला विद्यापीठात पोहोचण्यासाठी अडथळ्यांचा सामना करावा लागणार नाही. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातूनही रेल्वे सेवा क्रांतिकारी ठरते. राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० चा मूळ हेतू शिक्षणाला केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित ठेवत नाही, तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विस्तारित करते. जम्मू आणि काश्मीरमधील अनेक विद्यार्थिनींनी जम्मू विद्यापीठाने सुरू केलेल्या ज्ञानोदय एक्सप्रेससारख्या उपक्रमात भाग घेतला होता. त्यांनी कबूल केले की, हा त्यांचा पहिलाच रेल्वे प्रवास होता. त्यांनी नवीन शहरे, विद्यापीठे, संग्रहालये आणि ग्रंथालये पाहिली. ही एक प्रकारची बौद्धिक मुक्तता होती.

काश्मीरच्या खोऱ्यांपर्यंत पोहोचणारी रेल्वेलाईन केवळ रुळांचे कनेक्शन नाही. असमान संधी समान व्यासपीठावर आणण्याची ही एक मूक क्रांती आहे. ती परस्परसंबंध पुनर्संचयित करते, त्यात भारताचा प्रत्येक कोपरा भावनिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या एकमेकांशी जोडलेला आहे. 'वंदे भारत एक्सप्रेस'मुळे जणू काही खोऱ्याच्या विकासाच्या खिडक्या उघडल्या आहेत. आता बर्फाच्छादित पर्वतांवर फक्त बंकर नाहीत, तर पूलही आहेत. आता शंका मागे सोडून अनंत शक्यता निर्माण झाल्या आहेत. आता काश्मीर विकासाचा प्रकाश आहे आणि हा भारताचा सर्वात मोठा धोरणात्मक आणि नैतिक विजय आहे. हा रेल्वे प्रवास खोऱ्याला जुन्या निष्क्रियतेतून मुक्त करुन गतिमान भविष्याकडे घेऊन जात आहे. हा असा निर्णायक क्षण आहे, जिथे शिक्षण, समानता, दळणवळण आणि सुरक्षा रेल्वे रुळांवर एकत्र धावत आहेत आणि त्यांच्यासोबत लाखो स्वप्ने तयार होत आहेत. काश्मीरमध्ये रेल्वेचे आगमन सोपे नव्हते. हा एक दीर्घकालीन प्रवास आहे. देश ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असताना ब्रिटिशांनी जम्मू आणि काश्मीरमध्ये पहिल्यांदाच ट्रेन चालवली. १८९७ मध्ये ही ट्रेन जम्मू आणि सियालकोटदरम्यान ४० ते ४५ किलोमीटर अंतरावर चालवण्यात आली. भारताचे विभाजन झाले नव्हते, तेव्हा १९०२ आणि १९०५ मध्ये रावळपिंडी ते श्रीनगर रेल्वे मार्ग प्रस्तावित करण्यात आला होता. हा मार्ग काश्मीर खोऱ्याला झेलममार्गे भारताच्या रेल्वे नेटवर्कशी जोडू शकला असता; परंतु जम्मू आणि काश्मीरचे महाराजा प्रताप सिंह यांना रियासीमार्गे जम्मू-श्रीनगर रेल्वे मार्ग हवा होता. यामुळे या दोघांपैकी कोणीही कोणत्याही प्रकल्पावर पुढे जाऊ शकले नाही. १९७५ मध्ये पठाणकोट-जम्मू मार्ग सुरू होईपर्यंत पंजाबमधील पठाणकोट हे जम्मू आणि काश्मीरसाठी सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन होते. १९८३ मध्ये जम्मू आणि उधमपूरदरम्यान रेल्वेमार्गाचे काम सुरू झाले. ही मार्गिका ५३ किलोमीटर लांबीची होती आणि पाच वर्षांमध्ये पूर्ण होणार होती; पण ती बांधण्यासाठी २१ वर्षे लागली. या मार्गिकेचे काम सुरू होते म्हणून १९९४ मध्ये केंद्र सरकारने ती उधमपूर ते श्रीनगर आणि नंतर बारामुल्लापर्यंत वाढवण्याची घोषणा केली. या प्रकल्पाला उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल लिंक (यूएसबीआरएल) प्रकल्प असे नाव देण्यात आले आणि मार्च १९९५ मध्ये २,५०० कोटी रुपये खर्चून त्याला मान्यता देण्यात आली. २००२ मध्ये हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला आणि त्याचे वेगवेगळे भाग हळूहळू सुरू झाले. हा एकूण २७२ किलोमीटरचा ट्रॅक आहे आणि ४३,७८० कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आला आहे. त्यात ३६ बोगदे आणि ९४३ पूल समाविष्ट आहेत. मोठी कामगिरी म्हणजे या मार्गावरून कटरा आणि श्रीनगर आता फक्त तीन तासांच्या अंतरावर आहेत. हा प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रात भारतासाठी एक मोठी कामगिरी आहे. हिमालयीन पर्वतरांगांमधील शिवालिक टेकड्या आणि पीर पंजाल पर्वतरांगा भूकंपाच्या दृष्टीने सर्वात धोकादायक झोन ४ आणि ५ मध्ये येतात. हा संपूर्ण परिसर कठीण आणि बर्फाळ आहे. त्यामुळे पूल आणि बोगदे बांधण्याचे काम अत्यंत आव्हानात्मक होते. वंदे भारत ट्रेन कतरा आणि श्रीनगरमधील अंतर सुमारे तीन तासांमध्ये पूर्ण करते. रस्त्याने लागणाऱ्या वेळेपेक्षा अर्ध्या वेळात ती पोहचते. या गाड्या कडाक्याच्या थंडीतही धावतील आणि हवामान कोणतेही असो, वर्षभर खोऱ्याला देशाशी जोडून ठेवतील. लवकरच ही ट्रेन जम्मू-तावीपर्यंतही धावेल. त्यामुळे देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातून थेट ट्रेन पकडून श्रीनगरला पोहोचता येईल.

जम्मू-काश्मीरची अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे आणि त्यासाठी ट्रेन खूप महत्त्वाची आहे. ही ट्रेन काश्मीरमध्ये पोहोचल्यानंतर जम्मू आणि काश्मीरची अर्थव्यवस्था निश्चितच मजबूत होईल आणि पर्यटनाला बळकटी मिळेल. यामुळे सफरचंद, सुका मेवा, पश्मिना शाल, हस्तकला यासारख्या वस्तू देशाच्या इतर भागात जलद आणि स्वस्त दरात पाठवणे सोपे होईल. यासोबतच, खोऱ्यात दररोज वापरल्या जाणाऱ्या वस्तूदेखील कमी किमतीत पोहोचू शकतील. ही एक दखलपात्र कामगिरी आहे.

ही युध्दखोरी कुठे नेणार?

वेध

– शंतनु चिंचाळकर

काही कट्टरवादी देश युद्धप्रसंगी काय निर्णय घेतील, याची हमी कोणताच देश देऊ शकत नाही. त्यातील एक असलेल्या इराणमध्ये अण्वस्त्रे तयार करण्याची क्षमता आहे आणि अस्तित्वाचा सामना करावा लागला तर हा देश अण्वस्त्रांची निर्मिती करून इस्रायलसारख्या देशांच्या अस्तित्वाला धक्का देऊ शकतो, अशी भीती अमेरिका, पाश्चिमात्य देश आणि इस्रायलला आहे. त्या निमित्ताने पश्चिम आशियामध्ये माजलेल्या युध्दखोरीचा हा वेध.

१० जून रोजी सीबीएस न्यूजने सूत्रांच्या हवाल्याने अमेरिकन अधिकाऱ्यांना सांगितले होते की, इस्रायल इराणमध्ये लष्करी कारवाई करण्याची पूर्वतयारी करत आहे. अमेरिकेला भीती होती की इस्रायलने इराणवर हल्ला केल्यास इराण शेजारी इराकमधील काही अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले करून प्रत्युत्तर देऊ शकतो. १२ जूनच्या रात्रीपासून इस्रायलने इराणवर प्रथम क्षेपणास्त्रांचा वर्षाव, त्यापाठोपाठ विमाने आणि ड्रोणद्वारे हल्ले सुरू केले. इस्रायलने केलेल्या या भीषण हल्ल्यात इराकचे सैन्य, हवाई संरक्षण प्रणाली आणि आण्विक कार्यक्रम च्या दृष्टीने अतोनात नुकसान झाले. इराण लष्कराचे मुख्य अधिकारी प्रमुख हुसेन सलामी आणि मेजर जनरल बघेरी यांच्याबरोबर कैक कमांडर तसेच सहा शास्त्रज्ञदेखील मरण पावले. प्रत्युत्तरादाखल इराणनेदेखील इस्रायलवर क्षेपणास्त्रांद्वारे हल्ले केले. त्यांनी इस्रायलच्या तेल अविवसह इतर प्रमुख शहरांचे नुकसान झाले. पाश्चात्य गुप्तचर संस्थांनी २००२ मध्ये इराणचा गुप्त आण्विक कार्यक्रम उघड केला होता. त्यानंतर बरीच वर्षे इराणी अधिकारी उघडपणे अण्वस्त्रे तयार करण्याची धमकी देत होते. मध्यंतरी हेलिकॉप्टर अपघातात इराणचे अध्यक्ष आणि परराष्ट्र मंत्री ठार झाले तेव्हाही त्या घटनेत इस्रायलचा हात असल्याचे आढळल्यास गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल, अशी धमकी इराणने दिली होती. त्यावेळीदेखील इराण अण्वस्त्रसंपन्न असल्याची शंका जगाला आली होती. डिसेंबर २०२४ मध्ये इराणचे माजी परराष्ट्रमंत्री कमल खराझी यांनी इस्रायलला सरळ सरळ आण्विक हल्ल्याची धमकी दिली. तेव्हापासूनच अस्वस्थ असणाऱ्या इस्रायलकडून इराणवर मोठा हल्ला होणार हे निश्चित होते. तसा तो झाला आणि जगभरात गदारोळ माजला.

इराणकडे आधीच अण्वस्त्रे आहेत आणि त्यांनी अद्याप त्यांची चाचणी केलेली नाही, असा दावा इराणी संसदेच्या परराष्ट्र धोरण समितीच्या माजी सदस्याने १० मे रोजी केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना इराण आण्विक हत्यार बनवण्याच्या अगदी जवळ पोहचला असल्याचे सांगितले. त्यामुळे या देशावर कठोर निर्बंध लादणे गरजेचे आहे, असे विधान करत त्यांनी इराणच्या तेल निर्यातीला लक्ष्य करण्याचा आदेश दिला. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्रायलची ढाल बनून उभ्या असलेल्या अमेरिकेलाही युद्धाच्या आगीत जाळण्याची धमकी दिली. या धम कीच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने अरबी समुद्रात लष्कराची तैनाती वाढवली. इस्त्रायलची सुरक्षितता हे अमेरिकेला चिंता वाटण्याचे कारण नव्हे, तर इराणच्या अण्वस्त्र संपन्नतेबाबतही अमेरिका साशंक आहे. म्हणून अमेरिकेने इस्रायलच्या आडून इराणवर हल्ले केले, असे म्हणायला जागा आहे. इस्रायलला इराणच्या अणुबॉम्बनिर्मितीच्या प्रयत्नांची आणि ते लपवून ठेवल्याची शंका आहे. आपल्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्यास इराण शत्रूराष्ट्रावर अण्वस्त्र हल्ला करण्यास कदापी कचरणार नाही. कट्टरवादाची पार्श्वभूमी असलेले काही देश युद्धप्रसंगी काय निर्णय घेतील याची कोणताच देश हमी देऊ शकत नाही. या व्यतिरिक्तही अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांना इराणबाबत भीती वाटते.

अण्वस्त्रे बनवण्याचे तंत्रज्ञान इराणने पाकिस्तानकडून मिळवले असण्याची शंका आहे. आपल्या देशात अतिरेकी संघटनांना थारा देणाऱ्या पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे कितपत सुरक्षित आहेत, याबद्दलही साशंकता आहे. तीच परिस्थिती इराणच्या बाबतीतही आहे. सीरिया, येमेन, पॅलेस्टीन आणि लेबनॉनमध्ये असलेल्या इस्रायलविरोधी हमास आणि हिजबुल्लाह यांच्या हाती ही अण्वस्त्रे पडल्यास अवघ्या जगात हाहाकार उडेल, ही भीती व्यक्त करताना इस्रायलने इस्फहान अणु तंत्रज्ञान केंद्राजवळ हल्ला केला होता. यामध्ये अणु संशोधन अणुभट्टी, युरेनियम रूपांतरण प्रकल्प आणि इंधन उत्पादन प्रकल्प आहे. पण त्यावेळी या हल्ल्यात इराणच्या अण्वस्त्र केंद्रांना इस्रायलने थेट लक्ष्य केले नसले तरी, इराणच्या नेतृत्वाने आपल्या आण्विक धोरणावर पुनर्विचार करण्यासाठी धमकी म्हणून हे हल्ले केल्याचे इस्रायलने स्पष्ट केले. मात्र तरीही इराणने आपला आण्विक कार्यक्रम पुढे चालू ठेवल्याने १२ जून रोजी इस्रायलने इराणच्या आण्विक ऊर्जा प्रकल्पावर हल्ले केले.

गेल्या काही दिवसांपासून इस्राएल आणि इराणमधील तणाव त्यांच्या पारंपारिक प्रॉक्सी स्वभावापासून दूर गेला आणि एकमेकांच्या प्रदेशांवर थेट हल्ल्यांच्या रूपात प्रकट झाला. इराणच्या आण्विक समस्येवर वेळेवर आणि गैरलष्करी तोडगा काढण्याची गरज वाढली म्हणूनच ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी आल्यावर इराणवर व्यावसायिक निर्बंध लादायला सुरुवात केली. पण आजवरचा इतिहास पाहता इराण त्याकडे कितपत गांभिर्याने पाहील याबाबत इस्रायल साशंक होता. त्यातूनच या देशाने मोसाद या आपल्या गुप्तचर यंत्रणेद्वारे इराणच्या आण्विक कार्यक्रमाची गुप्त माहिती काढली आणि कथित धोका लक्षात येताच हे हल्ल्याचे पाऊल उचलले, असे म्हणायला जागा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून इराणने हमास आणि हिजबुल्लासारख्या इस्रायलविरोधी दहशतवादी संघटनांना पाठिंबा म्हणून शस्त्रास्त्रे खरेदीसाठी खूप पैसा खर्च केला. त्यामुळे त्यांना इस्रायलशी दोन हात करायला मदत झाली. इराण या दहशतवादी संघटनांना मदत म्हणून लष्करी तळ, शस्त्रास्त्रांचे डेपो आणि क्षेपणास्त्र कारखाने चालवतो. इस्रायलच्या मते इराण गुप्तपणे अण्वस्त्रनिर्मिती करण्याच्या मार्गावर असून त्याची युरेनियम समृद्धीकरणाच्या क्रियाकलापांची व्याप्ती अज्ञात आहे. अशा परिस्थितीत इराणने अण्वस्त्रनिर्मिती केल्यास ती दहशतवादी संघटनांच्या हाती लागण्याची शक्यता आहे. अशी अण्वस्त्रे दहशतवाद्यांकडून कोणाही देशाविरुद्ध वापरली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच इस्राएल इराणविरुद्ध करत असलेल्या कारवाईला अमेरिकेसाठी पाश्चात्य देशांचा ठाम पाठिंबा असेल.

यातून अगदी जागतिक युद्धाला सुरुवात होण्याची शक्यता नसली तरी हिजबुल्लाह दहशतवादी संघटनेमुळे लेबनॉनसारखा एखाद दुसरा देश यात ओढला जाण्याची शक्यता आहे. एका वेळी पाच-सहा राष्ट्रांशी दोन हात करणाऱ्या इस्रायलला त्याने फारसा फरक पडत नसला तरी यावेळी इस्रायलने इराणवर केलेले हल्ले पाहता कोणाचाही विरोध न जुमानता आरपारची लढाई करण्याचा इरादा केल्याचे स्पष्ट जाणवत आहे. इस्रायलने इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचे अतोनात नुकसान केल्यावर इराणचे संरक्षणमंत्री मोहम्मद बघेरी यांनी इस्रायलने इराणवरील हल्ले ताबडतोब न थांबवल्यास पाकिस्तान इस्रायलविरुद्ध अण्वस्त्रांचा वापर करेल, असे विधान करून खळबळ उडवून दिली तेव्हा इराणनंतर पाकिस्तानची अण्वस्त्रे इस्रायल आणि अमेरिकेकडून नष्ट केली जातील, अशी अटकळ बांधली जाऊ लागली. त्यानंतर युद्धाच्या पाचव्या दिवशी इराण-इस्रायलमधील संघर्ष विकोपाला जाऊन, इस्राइलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी इराणी जनतेने राजधानी तेहरान हे शहर सोडून जावे असे फरमान काढले. एकीकडे इराणचे राष्ट्रपती खामेनी यांना मारल्याशिवाय हे युद्ध थांबणार नाही अशी घोषणा इस्रायलकडून केली जात होती, तर खामेनी कुठे आहेत याची माहिती आम च्याकडे असून आत्ता त्यांना टार्गेट करायचा कोणताही इरादा नसल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले.

अमेरिकेने या हल्ल्यात आपली कोणतीही भूमिका नव्हती हे स्पष्ट केले आहे. ११ जूनला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्रे बनवू देणार नाही असे वक्तव्य केले होते. १६ जून रोजी कॅनडातील अल्बर्टा येथील कनानास्किस येथिल जी ७ शिखर परिषदेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भाग घेतला होता. त्या परिषदेत सर्व देशांनी एकमताने इस्रायलची कारवाई उचित असल्याचा ठराव मंजूर करत पूर्ण पाठिंबा दिला. त्याच दिवशी डोनाल्ड ट्रम्प संमेलन सोडून अमेरिकेला परतले. तेव्हाच ते काही तरी मोठी घोषणा करणार हे निश्चित झाले. इराणच्या हवाईक्षेत्रावर पूर्णपणे आमचे वर्चस्व प्रस्थापित झाले असून इराणने त्वरित युद्धातून बिनशर्त माघार घ्यावी अन्यथा परिणाम वाईट होतील, अशी धमकीही दिली. या घोषणेद्वारे चालू युद्धात आपलाही सहभाग असल्याचे आणि इराणवर अमेरिकेकडूनही हल्ले होणार याचे सरळ संकेत मिळाले. हिंद सागरात अमेरिकेने आपल्या विम ानवाहू नौका हलवल्यावर या संकेतांना दुजोरा मिळाला. अशा परिस्थितीत पाश्चिमात्य देश आणि काही मुस्लिम राष्ट्रे युद्धात उतरतील आणि तिसऱ्या जागतिक युद्धाला सुरुवात होईल असा अंदाज काही संरक्षणतज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. एक युद्ध एखाद्या विकसित किंवा विकसनशील देशाला १५-२० वर्ष मागे घेऊन जाते आणि अशा युद्धात जाणारे निष्पाप जनतेचे बळी आणि होणारे हाल तर कैक वर्षांचा आघात करून जातात.

विजेच्या तारांना चिकटून मुलाचा मृत्यू

जामखेड शहरातील आठ दिवसातील तिसरी घटना; पोलिसात मृत्यूची नोंद

जनता आवाज वृत्तसेवा

जामखेड : क्रिकेट खेळताना स्लॅपवरती गेलेला बॉल फ्लेक्सच्या लोखंडी पाईपने काढत असताना घराजवळील मुख्य विज वाहिनीचा शॉक लागुन १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. ही घटना जामखेड शहरातील खर्डा चौकाजवळील टेकाळेनगर या ठिकाणी घडली. (वय १२, रा. टेकाळे नगर) विजेच्या तारांना चिकटून मृत्यू झालेली ही आठ दिवसांतील तिसरी घटना आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जामखेड शहरातील खर्डा चौकातील टेकाळे नगर या ठिकाणी सोमवार दि. ३० जुन रोजी सायंकाळी साडेपाच वाजता प्रणव प्रशांत टेकाळे

हा आपल्या मित्रांनसोबत घराजवळ क्रीकेट खेळत होता. प्रणव टेकाळे याच्या घराजवळुनच मुख्य विद्युत वाहीनीच्या तारांची लाईन गेली आहे. क्रिकेट खेळत असताना बॉल स्लॅपवरती गेला या जवळच मुख्य विजेच्या तारा होत्या.

प्रणव याने फ्लेक्सचा लोखंडी पाईप सदरचा बॉल काढण्यासाठी घेतला व बॉल काढत असताना त्याच्या हातातील पाईपचा या लाईटच्या तारांना धक्का लागला व त्याचा मृत्यू झाला. यावेळी त्याठिकाणी असलेले त्याचे चुलते नातेवाईकांनी त्याला तातडीने रुग्णालयात नेले मात्र पुर्वीच त्याचा मृत्यू झाला. जामखेड पोलीस स्टेशनला याची खबर मयूर टेकाळे यांनी दिल्याने जामखेड पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शहरातील सदाफुले वस्ती येथील टेकाळे नगर येथे विजेचा तारेला स्पर्श होऊन प्रणव टेकाळे वय १२ वर्षीय या बालकाचा मृत्यू झाला आहे. हि घटना संपूर्ण शहरात पसरली होती. पण महावितरणच्या अधिकाऱ्यांना काहीही माहिती नव्हते. घटनेनंतर तीन तास झाले तरीही कोणीही महावितरणचे अधिकारी घटनास्थळी गेले नव्हते.

आठ दिवसात तिघांचा मृत्यू

मागील आठ दिवसापूर्वीच जामखेड तालुक्यातील बाळगव्हाण येथील उसाच्या शेतात खत टाकण्यासाठी गेलेल्या बाप-लेकाचा शेतातील खाली पडलेल्या विजेच्या तारांना चिकटून जाग्यावरच मृत्यू झाला होता. विद्युत महामंडळाच्या गलथान कारभारामुळे या दोघांचा मृत्यू झाला असल्याचे ग्राम स्थांन कडुन बोलले जात होते. यानंतर खर्डा- बाळगव्हाण येथील वायरमन यांना दोषी ठरवुन मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची जाम खेड तालुक्यातील येत्या आठ दिवसातील ही तिसरी घटना आहे. मागिल आठ दिवसात विजेच्या तारांना चिकटून तिघांचा मृत्यू झाला आहे.

सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घाला : आ. पाचपुते

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीगोंदा : सभागृहात प्रश्न उपस्थित करुन अवघ्या महाराष्ट्राच्या चर्चेत असलेले श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. विक्रम पाचपुते यांनी महाराष्ट्राच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदीचा प्रश्न उपस्थित करुन सभागृहचे लक्ष वेधले.

महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून क्षयरोग व इतर संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी आणण्यासाठी सरकार कोणत्या उपाययोजना किंवा कायदे करणार असल्याचा प्रश्न उपस्थित करुन सभागृहाचे व मंत्री महोदयांचे लक्ष वेधले.

कोरोना, स्वाईन फ्लू, क्षयरोग असणारी व्यक्ती पानम साले, गुटखा, तंबाखू जन्म पदार्थ खावुन थुंकणारी व्यक्ती असेल तर त्यापासून संसर्ग वाढुन तो फैलावु शकतो. म्हणून सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घातल्यास संसर्ग रोखु शकतो म्हणून सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालणारे कायदे करुन अमलात आणणे गरजेचे असल्याचे आ. पाचपुते यांनी सांगितले.

आरोग्य मंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

आ. पाचपुते यांच्या लक्षवेधीबाबत महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, स्वच्छ मोहिमेंतर्गत लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून तुमच्या सूचना अमलात आणण्यासाठी विचार करणार असल्याचा सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

शेतकऱ्यांच्या प्रश्नाने गाजले अधिवेशन

देण्याचाच हा प्रकार म्हणावा लागेल. सरकारची ही हुकुमशाही महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी बघत आहे.

शिरूरचे आमदार माऊली कटके यांनी मंगळवारी पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांचा मुद्दा पावसाळी अधिवेशनात मांडला. विधानसभेत बोलताना ते म्हणाले, पुणे महापालिकेत ३४ गावे समाविष्ट झाली असली तरी अद्याप या गावातील घरे बेकायदेशीर आहेत. त्यांचा टॅक्स आपण घेतो. तेथील नागरिकांची बांधकामे अधिकृत करावी, अशी विनंती कटके यांनी राज्य सरकारला केली.

जलसंधारण विभागात लवकरच ८,७६७ पदांची भरती होणार आहे. या पदांना हाय पॉवर कमिटीने मान्यता दिली आहे. त्यामुळे ही भरती प्रक्रिया एमपीएससीमार्फत जलदारित्या राबविली जाईल, अशी माहिती राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी मंगळवारी विधान परिषदेत दिली. विभागाची स्वतंत्र निर्मिती झाली, त्यावेळी १६४९९ पदांचा आकृतीबंध मंजूर झाला होता. ९९६७ पदे कृषी विभागाकडून आणि ६५१२ पदे जलसंपदा व ग्रामविकास विभागाकडून वर्ग होणे अपेक्षित होते. मात्र, कृषी विभागाकडून केवळ २१८१ पदांचीच मंजुरी मिळाली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

नागपूरसह संपूर्ण राज्यात गाजत असलेल्या बनावट शालार्थ आयडी घोटाळ्याची या विषयाची समज आणि ज्ञान असणाऱ्या वरिष्ठ आयएएस तसेच आयपीएस अधिकाऱ्यांची एसआयटी स्थापन करून चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मंगळवारी विधानसभेत केली. शिक्षण देणे हे पुण्याचे काम आहे. परंतु दुर्दैवाने शिक्षण विभागातच सर्वात जास्त भ्रष्टाचार होतो, असा घणाघाती आरोप भाजप आमदार प्रवीण दटके यांनी विधानसभेत शिक्षणमंत्री दादा भुसे यांना धारेवर धरताना केला. त्याला उत्तर देताना दादा भुसे यांनी नागपूर विभागात बनावट शालार्थ आयडीचा वापर करून काही चुकीचे प्रकार झाले आहे, हे मान्य केले.

अहिल्यानगर महानगरपालिकेची विक्रमी वसुली

प्रत्यक्ष कर महानगरपालिकेत जमा झाला आहे.

महानगरपालिकेने कराच्या वसुलीसाठी यंदा जनजागृतीवर अधिक भर दिला होता. त्यामुळे मागील वर्षीपेक्षा तीन कोटींनी अधिक कर जमा झाला आहे. यापूर्वी एप्रिल ते जून महिन्यात २२ कोटी, २४ कोटी रुपये कर वसुलीची नोंद झाली होती. यावर्षी वसुलीचा नवा विक्रम महानगरपालिकेने नोंदवला आहे.

विवेक कोल्हेंकडून मुख्यमंत्री फडणवीसांचे आभार

शासनाने यासाठी तातडीने निर्णय घेतला याबद्दल मी कृतज्ञ आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

शेतकऱ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरला असून, आता खरीप हंगाम सुरळीत पार पडण्यास मोठी मदत होणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, कोल्हे यांच्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रदेशाध्यक्ष चव्हाणांच्या नेतृत्वांत राज्यात भाजपा मोठे यश मिळवेल : मंत्री विखे पाटील

असलेले नेतृत्व प्रदेशाध्यक्ष पदावर विराजमान झाल्याने कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा उत्साह असल्याचे त्यांनी सांगितले.

आ. चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली. कल्याण डोंबीवली महानगर पालिका आणि डोबिवली विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार म्हणून त्यांनी विजयाची घोडदौड सुरु केली. सलग चार वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व ते करीत आहेत. सार्वजनिक जीवनात विकास कामांच्या प्रक्रीयेला पुढे जाण्याचा मोठा अनुभव तसेच एक कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष अशी त्यांची राहीलेली संघटनात्मक वाटचाल सर्वांसाठीच प्रेरणादायी असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

महायुती सरकारमध्ये विविध मंत्री पदांचा कार्यभार सांभाळताना त्यांनी नागरी हिताचे निर्णय घेतले. यामध्ये प्राधान्याने राज्यातील रस्ते विकासामध्ये त्यांचे योगदान महत्वपूर्ण राहीले. सरकार आणि संघटना यातील योग्य समन्वय साधण्याचा अनुभव आ. चव्हाण यांच्या पाठीशी असल्याने राज्यात भाजपाच्या संघटनात्मक कामाला त्यांचे बहुमोल असे मार्गदर्शन निश्चित उपयुक्त ठरेल.

जिल्ह्याच्या जलजीवन तक्रारींबाबत तारांकित प्रश्न

उपस्थित केला आहे. यात इचलकरंजीचे आ. राहुल आवाडे यांचा समावेश असून कोल्हापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यात जलजीवन योजनेच्या कामाबाबत असणाऱ्या तक्रारीची माहिती त्यांनी मागवली आहे.

पारनेरचे आ. काशिनाथ दाते यांनी जिल्ह्यातील अनेक गावांना होणारा पाणी पुरवठा हा दुषित असल्याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. आ. वरूण देसाई यांनी राज्यातील जलजीवन योजनेतील कामांना कशासाठी प्रशासकीय मान्यता दिल्या याबाबत माहिती मागवली आहे.

आ. प्रज्ञा सावंत यांनी नगरसह राज्यात जलजीवन योजनेवर मोठ्या प्रमाणात खर्च करूनही नागरिकांना पाण्याच्यासाठी का पायपिट करावी लागत आहे, याबाबत विचारणा केली आहे. कर्जत-जामखेडचे आ. रोहित पवार यांनी यवतमाळ जिल्ह्यातील पाणी प्रश्नावर प्रश्न विचाराल असून या ठिकाणी पाण्यासाठी १२ वर्षीय मुलीचा जीव गेल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. संगमनेरचे आ. अमोल खताळ यांनी पाणी टंचाईसह ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच यांच्या कामात त्यांच्या पतीचा वाढत्या हस्तक्षेपावर प्रश्न विचारला आहे.

गोहत्याप्रकरणी संतप्त प्रतिक्रिया

भाजपच्यावतीने संगमनेर पोलिसांना निवेदन

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : शहरात सर्रासपणे गोहत्या होत आहे. यावर कारवाई करावी, या मागणीसाठी भारतीय जनता पक्षाच्या महिला शहराध्यक्षा पायल ताजणे यांच्यासह शहर व तालुका पदाधिकारी यांनी संगमनेर शहराचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांना लेखी निवेदन दिले असून, भ्रष्ट पोलीस कर्मचारी व धमकी देणाऱ्या कसायांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र सरकारने राज्यात गोहत्या बंदी लागू केल्यानंतरही संगमनेरात मोठ्या प्रमाणावर गोहत्या सुरू आहे. त्यामुळे संगमनेर हे गोमांस विक्रीचे प्रमुख केंद्र बनत चालले आहे. अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी या विरोधात आंदोलने, मोर्चे व निवेदने देऊन प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. काही तरुण सतत पोलिसांना गोहत्येसंदर्भात माहिती देत असूनही, काही भ्रष्ट प्रवृत्तीचे पोलीस कर्मचारी ही माहिती कसायांपर्यंत पोहोचवत असल्याचे निष्पन्न झाले आहे. परिणामी संबंधित तरुणांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जातात व त्यांच्यावर हल्लेही होतात.

स्थानिक पोलिसांचे दुर्लक्ष

आहिल्यानगर येथील गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक या ठिकाणी येवून कारवाई करतात. मग येथील पोलिस नेमके करतात काय? या सर्व घटना गंभीर असून, याबाबत पोलीस दफ्तरी आधीही तक्रारी दाखल झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. अशाप्रकारची माहिती गुप्त ठेवून योग्य कारवाई करणे हे पोलीस प्रशासनाचे कर्तव्य आहे. मात्र, उलट काही कर्मचारीच गुन्हेगारांना संरक्षण देत असल्याचे चित्र दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत थेट अभिप्राय नोंदवा

जिल्हा पोलिसांकडून जनमत सर्वेक्षण मोहीम सुरू

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : जिल्ह्यातील नागरिकांना आता पोलीस प्रशासनाच्या कार्यपध्दतीबाबत थेट अभिप्राय देण्याची संधी मिळणार आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या पुढाकारातून जिल्हा पोलीस दलाने नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी विशेष जनमत सर्वेक्षण मोहिमेची सुरूवात केली आहे. ३० जून ते ९ जुलै या कालावधीत ही मोहीम राबवण्यात येणार असून, यामध्ये क्यूआर कोड व ऑनलाइन लिंकव्दारे सहभाग नोंदवता येणार आहे.

या मोहिमेचा उद्देश नागरिकांचे मत, सूचना व अभिप्राय गोळा करून पोलिसांच्या कार्यक्षम तेचे मूल्यांकन करणे आणि सेवा अधिक लोकाभिमुख बनवणे हा आहे. पोलिसांनी अंम लात आणलेल्या विविध उपाययोजना जसे की वाहतूक नियंत्रण, महिला सुरक्षेबाबतचे उपाय,

सायबर गुन्हेगारीविरोधातील कारवाई, तसेच अंमली पदार्थांविरोधात उचललेले पावले यावर नागरिकांनी आपला अभिप्राय द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सर्वेक्षणात भाग घेणाऱ्या नागरिकांनी ५० शब्दांत पोलिसांच्या कामगिरीबाबत आपला अभिप्राय मांडावा लागेल. तसेच, एकूण कार्यक्षमतेला १० पैकी गुण द्यावेत.

याशिवाय वाहतूक, महिला सुरक्षा, अंमली पदार्थविरोधी कारवाई व सायबर गुन्हे या चार स्वतंत्र विभागांसाठीही १ ते १० या गुणश्रेणीत मूल्यांकन करावे लागेल. मत नोंदवताना नाव किंवा फोन नंबर देणे बंधनकारक नाही. मात्र, संबंधित पोलीस ठाण्याचे नाव नमूद करणे आवश्यक आहे. नागरिकांनी दिलेले सर्व अभिप्राय गोपनीय ठेवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.पोलीस अधीक्षकपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात जोरदार मोहिम उघडली आहे. या पार्श्वभूमीवर, पोलीस दलाच्या कार्यपध्दतीत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढावे यासाठी ही अभिप्राय मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेव्दारे पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद वाढून विश्वासाची नवी पातळी निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सुधारणा ही निरंतर प्रक्रिया : एसपी घार्गे

या उपक्रमाबाबत माहिती देताना पोलीस अधीक्षक घार्गे म्हणाले, नागरिकांना अधिक चांगली सेवा देणे ही आमची प्राथमिकता आहे. सुधारणा ही एक निरंतर प्रक्रिया आहे. पोलीस प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व उत्तरदायी बनावे, यासाठीच ही मोहीम राबवण्यात येत आहे.

सुप्यातील डॉक्टरांनी केली वारकऱ्यांची सेवा

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : पंढरीच्या विठूरायाच्या भेटी ची आस लागून असलेल्या दिंडीतील वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यासाठी सुप्यातील डॉक्टरांनी आरोग्य तपासणी करून त्यांना औषधे पुरविले.

वारकऱ्यांच्या आरोग्य तपासणीत डॉ शत्रुघ्न मगर, डॉ. बाळासाहेब पठारे,डॉ सुभाष डेरे, डॉ. श्रीकांत मेहत्रे, डॉ. सुशील पादिर, डॉ. हनुमंत घायाळ, डॉ. अजय येणारे या सुपा परिसरातील डॉक्टरांनी वारकऱ्यांना आरोग्य सेवा दिली. याबद्दल दिंडीतील सर्वच वारकऱ्यांनी डॉक्टरांप्रती अतिशय सद्भावना व्यक्त करून डॉक्टरांचे आभार मानले. दिंडीतील वारकरी गेल्या ७ ते ८ दिवसांपासून दिंडीमध्ये रोज २० ते २५ किलोमीटर पायी चालत आहेत. त्यामुळे ज्या वारकऱ्यांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या सोडवण्यासाठी सुपा परिसरातील सर्वच डॉक्टर गेलेले होते व त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे वारकऱ्यांची आरोग्याची काळजी घेण्याचा प्रयत्न या निमित्ताने दिंडी मार्गावर केला आहे. त्याबद्दल दिंडीतील सर्व भाविक व वारकरी यांनी डॉक्टर मंडळींचे आभार मानले आहेत.

शिर्डीत मोफत नेत्र तपासणी शिबीर

लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टचे लाभले सहकार्य

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव शहर : श्री साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिर्डी नगरीमध्ये श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट व आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या वतीने पंधरावे मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व चष्मा वाटप शिबिर साईबाबांच्या पुण्यभूमीत यशस्वीरित्या संपन्न झाले.

यावेळी शंकरा आय हॉस्पिटलचे विश्वनाथ पाटील व साई दृष्टी ऑप्टिकल चे साई सोनवणे व त्यांच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.शिबिरात जवळपास १६०० रुग्णांची म ोफत तपासणी करण्यात आली व ४८ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियासाठी पनवेल येथे नेण्यात आले. या शिबिरासाठी शिर्डी शहर व परिसर तसेच म ालेगाव, अहिल्यानगर, येवला, संगमनेर, श्रीरामपूर, राहुरी, राहाता,कोपरगाव या भागा-तून आत्तापर्यंत १४,६५० पेक्षा जास्त गरजू व वयोवृद्ध रुग्णांनी शिबिरांचा लाभ घेतला. आत्तापर्यंत २०५० रुग्णांनी या म ोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा लाभ घेतला आहे.

२७ जुलै २०२५ रोजी होणाऱ्या १६ व्या मोफत शिबीराचा देखील गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष अरुण शिंदे-गायकवाड पाटील यांनी केले.तसेच ट्रस्टच्या विश्वस्त संगीता गायकवाड पाटील व साई नाईन ग्रुपचे संचालक साईराज गायकवाड पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

सेनापती बापट विद्यालयात सायंक्रीडाचा शुभारंभ

सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिडा उपक्रम

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : नगर एज्युकेशनच्या सेनापती बापट या विद्यालयाच्या माध्यमातून व क्रीडा शिक्षक सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या सुट्टीनंतर विविध प्रकारचे मैदानी खेळांचा सराव व शारीरिक व्यायाम विद्यार्थ्यांकडून व्हावा हा मानस ठेवत सायंक्रीडा मंडळाची स्थापना केली आहे.

सायंक्रीडा मंडळाच्या शुभारंभ प्रसंगी सदर समारंभाचे अध्यक्षस्थान सेवानिवृत्त शिक्षक रा. या. औटी यांनी भुषविले, तर सामाजिक कार्यकर्ते विजय डोळ यांच्यासह माजी विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. देशाचे भविष्य समजल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व क्रीडा उपक्रमाच्या माध्यमातून शारीरिक व बौद्धिकतेला प्रेरणा देण्यासाठी नगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने पारनेर मधील सेनापती बापट विद्यालयात नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रत्येकाचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक, भावनिक विकास हा खऱ्या अर्थाने मराठी माध्यमाच्या शाळेत होत असतो. आणि या मध्ये क्रीडाशिक्षक व ईतर शिक्षकांची भूमिका महत्वाची असते, असे प्रतिपादन अध्यक्षपदावरून शिक्षक नेते रा. या. औटी यांनी केले. आपल्या मनोगतात पारनेर शहराचे माजी उपसरपंच विजयराव डोळ आपल्या मनोगतात म्हणाले की, सायंक्रीडा मंडळ ही या विद्यालयाची परंपरा आहे. गेले अनेक वर्षात क्रीडा शिक्षक सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात नाविन्यपूर्ण यश मिळवले आहे. मी स्वतःही या विद्यालयातील सायंक्रीडा मंडळामुळे घडलो आहे.सदर कार्यक्रमाचे नियोजन संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या संकल्पनेतून भूषण भंडारी व अनिल भंडारी यांच्या सहकार्यातून कबड्डी,खो-खो व इतर मैदानी खेळांचा सराव या सायंक्रीडा मंडळाच्या माध्यम ातून नविन खेळाडू तयार करण्यासाठी हा अनोखा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याच्या यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक सुनिल गायकवाड व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

भटके विमुक्त समाजाचे आंदोलन

जनता आवाज वृत्तसेवा

आहिल्यानगर : भटके विमुक्त समाजाच्या न्याय मागण्यासाठी राज्य शासनाने दखल घ्यावी यासाठी भटके विमुक्त आदीवासी संयोजन समिती मार्फत जिल्हाधिकारी कार्यालयात शांततेच्या मार्गाने धरणे आंदोलन केले. भटक्या विमुक्त समाजाच्या अनेक काळापासुन प्रलंबित असलेल्या मागण्यावर लक्ष वेधण्यासाठी मुंबई येथे दिनांक १ ते ४ या कालावधीत संयोजन समि तीच्या वतीने धरणे आंदोलन करणार आहोत.

भटक्या विमुक्त समाजाच्या व्यथा समजुन घेण्यासाठी राज्यात मागील ३ महिन्याच्या कालावधीत २२ जिल्ह्यात ठिक ठिकाणी संवाद यात्रा काढण्यात आली होती. या संवाद यात्रेनंतर समाजा मध्ये बैठक आयोजीत करुन समाजातील घटकाच्या अनेक व्यथा, अडचणी समोर आल्या. ते प्रश्न, अडचणी सोडवण्यासाठी मुंबई येथे मंत्रालयात एक वेगळा विभाग तयार झाला पाहीजे. तसेच ॲट्रासिटी कायदा हा स्वतंत्र झाला पाहीजे. या सर्व विभागासाठी स्वतंत्र मंत्रीपद राखीव ठेवले पाहीजे. अश्या धोरणात्मक बाबींवर चर्चा झाली. याच अनुशंगाने दिनांक १ -४ जुलै रोजी मुंबई येथे धरणे आंदोलन करुन मुख्यमंत्री यांना मागणीचे निवेदन देऊन मागण्या मान्य करुन घ्यावयाच्या आहेत. तसेच राज्यातील सर्व जिल्ह्याचे प्रतिनीधी संबधीत जिल्हा धिकारी कार्यालयात धरणे आंदोलन करतील व मागणीचे निवेदन देतील.

यावेळी बापु ओहळ लोकअधिकार अंदोलन प्रवक्ते, लता सावंत, भटके विमुक्त संयोजन समिती सदस्य, राहुल पवार, सचिन भिंगारदिवे, पल्लवी होलार, मच्छिंद्र जाधव, तुकाराम पवार, मनीषा काळे, हौसाबाई जाधव, सविता जाधव, ज्ञानेश्वर काळे आदी उपस्थित होते.

केशव गोविंद बन येथील शाळेला संगणक भेट

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : रोटरी क्लब ऑफ श्रीरामपूर आणि इनरव्हील क्लब ऑफ श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केशव गोविंद बन येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी एक संगणक (कॉम्प्युटर) प्रदान करण्यात आला.तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल शिक्षणाची गरज ओळखून हा उपक्रम राबविण्यात आला. या संगणकामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक साक्षरतेचे धडे मिळतील, तसेच त्यांचे शिकणे अधिक प्रभावी आणि आनंददायी होईल, असा विश्वास शाळेच्या मुख्याध्यापकांनी व्यक्त केला.याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. अजित घोगरे, डायरेक्टर उल्हास धुमाळ, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ. शितल घोगरे, सदस्या कांचन शिरसाठ, सरपंच प्रणाली भगत, शाळा समिती अध्यक्ष विलास भगत, ज्ञानदेवराव गायकवाड, बी. एम. पुजारी, अदिती गायकवाड, प्रतीक्षा गायकवाड, शाळेचे शिक्षकवर्ग, मुख्याध्यापक कदम, जठाड, सय्यद उपस्थित होते.

येताना एक झाड घेवून या : आ. पाचपुते

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीगोंदा : दोन जुलै रोजी श्रीगोंदा तालुक्याचे आ. विक्रम बबनराव पाचपुते यांचा वाढदिवस आहे. खरंतर विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरु झाल्यामुळे आ. पाचपुते मतदारसंघात उपस्थित राहू शकत नव्हते. परंतु, कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे व प्रेमामुळे आ. पाचपुते काष्टी येथील निवासस्थानी सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यंत उपस्थित असणार आहेत.माध्यमांशी बोलताना आ. पाचपुते यांनी श्रीगोंदा व नगर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना नम्र आवाहन केले आहे की, आज रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी कोणीही फेटा, शाल, हार, पुष्पगुच्छ न आणता आपण निसर्गाचे काहीतरी देणे लागतो. या भावनेतून वृक्ष संवर्धन म्हणून कुठल्याही प्रकारचे एक झाड किंवा गरीब शालेय विद्यार्थ्यांसाठी वह्या भेट शुभेच्छा म्हणून घेवून याव्यात. आ. पाचपुते यांच्या वतीने वृक्ष लागवड करून वाढदिवस साजरा होणार आहे. शालेय भेटवस्त म्हणून आलेल्या वह्यांचे गरीब शालेय विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. तरी कृपया सर्वांना विनंती आहे की, आपण येताना वाढदिवसाची भेट म्हणून एक झाड किंवा शालेय साहित्य म्हणून वह्या घेऊन यावे, असे आवाहन आ. विक्रम पाचपुते यांनी श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांना केले आहे.

शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : शहरातील नालेगाव, गाडगीळ पटांगण, चितळे रोड, दिल्ली गेट, गांधी मैदान या परिसरामध्ये मोकाट कुत्रे टोळक्याने फिरत असल्यामुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण होऊन त्रस्त झाले आहे.

कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांना रस्त्यावरून फिरणे देखील कठीण झाले आहे. लहान मुलांवर अक्षरशा कुत्र्यांची टोळकी हल्ला करत जखमी करत आहे. एखाद्या दिवशी अनुचित घटना घडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. नालेगाव येथे माझ्या ५ वर्षाच्या लहान मुलावर कुत्र्याने हल्ला केला, त्यानंतर उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे नेण्यात आले. यावेळी दररोज नागरिकांवर कुत्र्यांची हल्ले होत असून मोठया प्रमाणात रेबीज इंजेक्शन लागत आहे. अशी माहिती सिविल हॉस्पिटल प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

महापालिकेच्या कुठल्याही उपयोजना नसल्यामुळे शहरातील नागरिकांना कुत्र्यांच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे, तरी येत्या ८ दिवसात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. अन्यथा महापालिकेत अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये कुत्रे सोडण्याचे आंदोलन केले जाईल. असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विकी वाघ यांनी निवेदनाद्वारे महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना दिला आहे. यावेळी प्रा. माणिकराव विधाते, सुरेश बनसोडे, भैय्या रोहकले, राकेश मिसाळ, गौरव सुरसे, गणेश दातरंगे, पै. अनिल वाणी, दत्ता वामन, अनिरुद्ध भोर, अक्षय पवार, संदीप ठाणगे, करण लांडे, बंटी काकडे, शिवम भंडारी, अतुल कावळे, अण्णा नायर, शुभम कावळे, मंथन चव्हाण, प्रसाद कपिले आदी उपस्थित होते.

विविध उपक्रमांनी नाईक जयंती साजरी

शासकीय अधिकाऱ्यांची कार्यक्रमांना होती उपस्थिती

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पाथर्डी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील नाईक चौकात वसंतराव नाईक यांच्या पूर्णकृती पुतळ्यास मान्यवरांकडून अभिवादन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन समस्त गोरसेना व गोरबंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले.

याप्रसंगी तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, गट विकास अधिकारी शिवाजी कांबळे, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, पोलिस उपनिरीक्षक विलास जाधव, प्रभाकर राठोड, आर. के. चव्हाण, नवनाथ चव्हाण, अरविंद सोनटक्के, डॉ. मृत्युंजय गर्जे, नंदकुमार शेळके, बंडूशेठ बोरुडे आदी उपस्थित होते.

दरम्यान पाथर्डी पंचायत समितीमध्ये पंचायत समिती कृषी विभागातर्फे वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात तहसीलदार डॉ. उद्धव नाईक म्हणाले की, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी कृषी, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे राज्यात कृषी विद्यापीठांची स्थापना झाली आणि महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून शेतीसाठी नैसर्गिक खतांचा अधिक वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. कृषी अधिकारी महादेव लोंढे म्हणाले की, १९७२ च्या दुष्काळात वसंतराव नाईक यांनी अन्नधान्याच्या संकटावर मात करण्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेतले. त्यांच्या कार्यकाळात कृषी विद्यापीठे सुरू झाली, जलसंधारणाला चालना मिळाली आणि राज्यात हरितक्रांती घडली. त्यांच्या प्रयत्नांमुळे केवळ शेतीच नव्हे तर शेतकऱ्यांचं जीवनही बदललं.

शेतकऱ्यांचा करण्यात आला सन्मान

या कृषीदिनानिमित्त तालुक्यात शिराळा येथील बाजरीचे प्रथम क्रमांकाचे उत्पादन निखिल घोरपडे, द्वितीय शशिकांत शिंदे (भोसे), तरतूरी मध्ये तृतीय क्रमांकाचे काचे उत्पादन घेणारे हनुमंत घोरपडे,(शिराळ) या शेतकऱ्यांचा तालुका कृषी कार्यालयाकडून सन्मान करण्यात आला.

जाहीर प्रगटन

समस्त गावकरी कर्जत ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात सौ. वर्षा अमित सावंत रा. माळीनगर ता. माळशिरस जिल्हा सोलापूर यांनी त्यांच्या नामे स्वराज अमित सावंत यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

सदरील व्यक्तीचा जन्म कर्जत ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी दि.१२/०२/२०१३ रोजी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणेसंबंधी दि.०२/०५/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तींच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का

तहसिलदार कर्जत

डॉ. सुजय विखेंसह आ. राजळेंमुळेच जलक्रांती

शेतकऱ्यांना दिलासा; जिरेवाडी येथील बंधाऱ्याचे लोकसहभागातून खोलीकरण व रुंदीकरण

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : गाळमुक्त धरण, जलयुक्त शिवार या महत्वाकांक्षी शासकीय योजनेअंतर्गत जिरेवाडी गावातील बंधारा क्रमांक १ चे खोलीकरणाचे भव्य काम यशस्वीरित्या पूर्ण झाले असून, यामुळे जलसंधारण क्षेत्रात गावाने एक मोठे पाऊल पुढे टाकले आहे. या कामांतर्गत सुमारे ३५० मीटर खोलीकरण करण्यात आले असून, दोन्ही बाजूंनी जिरेवाडी व सोनोशी गावच्या शेतकऱ्यांसाठी शेतीपर्यंत जाणारे रस्तेही तयार करण्यात आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांपासूनच्या पाण्याच्या आणि रस्त्याच्या समस्येवर कायमचा इलाज मिळाला आहे.

> बंधाऱ्याचे खोलीकरण व रुंदीकरण कामामुळे जिरेवाडी व परिसरातील शेतीसाठी सततचा पाणीपुरवठा सुनिश्चित होणार असून, स्थानिक शेतकरी अर्थिकदृष्ट्या सक्षम होणार आहे.
> – मुकुंद आंधळे

या उपक्रमात प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका अध्यक्ष मुकुंद आंधळे, तसेच ग्रामपंचायत सदस्य नवनाथ आंधळे यांनी पुढाकार घेतला. शेतकऱ्यांनी या दोघांचे तसेच ग्राम पंचायतीचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.या बंधाऱ्याचे खोलीकरण केवळ पाणीसाठा वाढवण्यासाठी नव्हे, तर जिरेवाडी आणि आसपासच्या शेतकऱ्यांसाठी जलक्रांतीचे दार उघडणारा महत्वाचा टप्पा ठरला आहे.

पावसाळ्यात बंधारा पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर शेतीच्या पाण्याची दीर्घकालीन समस्या मोठ्या प्रमाणात सुटणार असून, याचा थेट फायदा शेतमालाच्या

उत्पादनात वाढ, खर्चात बचत आणि शेती व्यवसायात स्थैर्य निर्माण होण्यात होणार आहे. या कामामुळे शेतकरी वर्गात आशा निर्माण झाली असून, या जलसंधारण उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात जलसाक्षरतेचा ठसा उमटल्याचे चित्र दिसून येत आहे.

या उपक्रमास मंजुरी मिळवण्यासाठी आ. मोनिका राजळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, पाणीपुरवठा विभागाचे अभियंता रुपनर, आणि नामचे संग्राम खलाटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कामात ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग दिसून आला. सरपंच लक्ष्मी आंधळे, उपसरपंच रंजना कचरे, तसेच विष्णू आंधळे, राजेंद्र बडे, प्रकाश आंधळे, अनिल आंधळे, नारायण आंधळे, अण्णासाहेब पवळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

काळभैरवनाथ दिंडीचे पंढरपूरला प्रस्थान

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : ब्रह्मकालिन तात्या महाराज यांच्या आशिर्वादाने तसेच समस्त ग्रामस्थ देऊळगाव गलांडे यांच्या सहकार्याने व तात्या महाराज काटकर यांच्या मार्गदर्शनाने श्री क्षेत्र देऊळगाव गलांडे,ता. श्रीगोंदा ते पंढरपुर पायी दिंडी सोहळाचे प्रस्थान झाले. दिंडीचे हे ४ थे वर्ष आहे. यामध्ये पंचक्रोषीतील असंख्य भाविक सहभागी झाले.

दि. ७ जुलै रोजी अश्विनीताई रणसिंग महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर रामराव महाराज गलांडे यांचा काल्याचा महाप्रसाद होईल व दिंडीची सांगता होईल. दिंडी सोहळाचा पंढरपूर येथील मुक्काम गडदे आण्णा विटभट्टी, मोठा विठ्ठल शेजारी, पंढरपुर येथे राहणार आहे. दिंडीमध्ये तात्या काटकर महाराज, केशव महाराज बावर, दत्तात्रय महाराज गव्हाणे, अश्विनीताई महाराज रणसिंग, दत्तात्रय बोडजकर महाराज, केशव महाराज, दत्तात्रय महाराज गव्हाणे आदी सहभागी आहेत.

लेखी आश्वासनानंतर थोरातांचे उपोषण स्थगित

जनता आवाज वृत्तसेवा

राहाता : तालुक्यातील एकरूखे येथे रामपूरवाडी एकरूखे शिवरस्ता सिमेंट काँक्रेटीकरणाचे रखडलेले काम त्वरीत सुरु करण्या करीता आश्वासनानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले आहे.

एकरूखे रामपूरवाडी शिव रस्त्यासाठी उपोषणाचा इशारा देऊन देखील रस्त्याचे काम झाले नसल्याने शनिवारी सकाळी दहा वाजेच्या दरम्यान थोरात यांनी एकरूखे ग्रामपंचायत कर्यालयाच्या आवारामध्ये उपोषणास सुरवात केली असता एकरूखे ग्राम पंचायतीच्या वतीने लगेचच रस्त्यावर मुरमीकरण करण्यात आले आहे.

पुढील दोन दिवसांमध्ये त्यावर खडीकरण करु, असे आश्वासन एकरूख्याचे सरपंच जितेंद्र गाढवे यांनी यावेळी दिले व राहाता तहसीलदारांबरोबर आपण या रस्त्याबाबत चर्चा करुन या रस्त्याचे काम पूर्ण करु, असे उपोषणकर्त्यास गाढवे यांनी सांगितले आहे.

यावेळी उपोषणाला पाठींबा देण्याकरिता प्रभाकर थोरात, प्रवीण पारखे, राजू जाधव, बंडू मोरे, लक्ष्मण थोरात, वाल्मिक गोरे, सागर सोनावणे, किशोर बर्डे, अक्षय थोरात, निर्मला थोरात, पदमा पारखे, सोनाली थोरात, चंद्रकला थोरात, राधाबाई थोरात, शीतल थोरात, अनुसया थोरात आदी उपस्थित होते.

... आपणास नक्की न्याय मिळेल : भवर

राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक देवेंद्र भवर यांनी यावेळी उपोषणकर्त्यांच्या भावना जाणून घेत त्यांनी मध्यस्ती करत लवकरच तुमच्या समस्येवर तोडगा निघेल. त्यामुळे आपण उपोषण सोडा ही लोकशाही आहे. संविधानाने आपल्याला न्याय हक्क मागण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे आपणास नक्की न्याय मिळेल, असे न झाल्यास आपला उपोषणाचा अधिकार अबाधितच राहणार आहे.

आयुष्यात मैत्री अन् जिव्हाळ्याचे सद्भाव मोलाचे : डॉ. शिंदे

जनता आवाज वृत्तसेवा

अकोले : श्रद्धा आणि आदरभाव फार मोलाचा असून आईवडिलांसह गुरुजन, शिक्षकांना आयुष्यात कधीही विसरू नका. अवतीभवतीचे पर्यावरण आणि निसर्ग विश्वातील नोंदी जरुर ठेवत चला, तरच आयुष्याला दिशा लाभेल, असे प्रतिपादन डॉ. सुनील शिंदे यांनी केले.

अकोले तालुका एज्युकेशन संस्थेच्या ढोकरी येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव तसेच विद्यालयाच्या वर्धापनदिन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कचरुपाटील शेटे होते. अकोले एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचे पैलू उलगडताना भविष्यकालीन नियोजनाची भूमिका स्पष्ट केली. संस्था सचिव सुधाकर देशमुख यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल सकौतुक अभिमान व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कचरुपाटील शेटे, माजी मुख्याध्यापक विठ्ठल शेटे यांनी मनोगतात संस्थेकडून भविष्यकालीन योजनांविषयी काही सूचना केल्या. याप्रसंगी खजिनदार धनंजय संत, रमेश राक्षे, माधव तिटमे, पुंडे या मान्यवरांसह ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. रमेश राक्षे आणि डॉ. सुनील शिंदे यांनी शालेय विद्यार्थ्यांना दिलेल्या वह्या तसेच शैक्षणिक साहित्यांच्या भेटीचे वितरण करण्यात आले.

> बदलत्या जमान्यात भौतिक सुविधांचा अतिरेकी वापर प्रमाणापेक्षा अधिक वाढल्याने हिंसक वृत्ती बळावली आहे. मैत्री, नाती, आपुलकी, जिव्हाळा हे सद्भाव लयाला जात आहेत. शिक्षक, शाळा, संस्कृती विसरुन चालणार नाही, अरण्य ऋषी ज्येष्ठ साहित्यिक चितमपल्ली यांच्या साहित्याचे जरुर वाचन करा.
> – डॉ. सुनील शिंदे

विहीरीची त्वरित नोंद करून पाणी पुरवठा करा

पंचायत समिती कार्यालयासमोर हलगी बजाव आंदोलन

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीगोंदा : भावडी गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी भावडी ग्रामपंचायतीने सन १९९२ मध्ये विहीर खोदलेली आहे. त्या विहिरीवरून गावातील अनुसुचित जातीतील नागरिकांना पाणी पुरवठा होत होता मात्र गावातील बाळु सोपाना शिंदे व त्याची मुले यांनी सदर विहिरीशी काही एक संबंध नसताना बेकायदेशीर रित्या ग्रामपंचायत दप्तरी नोंद करुन विहीरीवरील विद्युत पुरवठा व पाइपलाइनची मोडतोड करून पाणी पुरवठा गेल्या बारा महिन्यांपासून बंद केला आहे.

याबाबत ग्रामपंचायत व पंचायत समिती यांचेकडे ग्रामस्थांनी वेळोवेळी पाठपुरावा करुनही अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नसल्याने अनुसुचित जातीतील नागरिकांना व गावाला पाणी मिळत नसल्याने पाण्यासाठी वयस्कर व्यक्ती पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. लोकांना त्याचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा

लागत आहे. सदर विहीरीबाबत महसुल अधिकारी यांनी पाहणी करुन पंचनामा करून याबाबत जनसुनावणी घेऊन सदर विहिरीची नोंद ग्रामपंचायत तप्तरी करावी. ३० मे २०२५ रोजी ठरावाची प्रत देऊन त्याची त्वरित अंमलबजावणी करावी. ग्राम सेवक यांची बदली झाल्याने दुसरा ग्रामसेवक का दिला नाही, त्याबाबत कार्यवाही करावी.

याबाबत कार्यवाही करावी यासाठी अन्यथा ३० जून २५ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर हलगी बजाव आंदोलन सूरू केले आहे.

कर्जमाफीसाठी शिवसैनिक उतरले रस्त्यावर

शिवसैनिकांनी भगवे झेंडे घेवून सरकारच्या विरोधात केली घोषणाबाजी

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : कर्जत-जामखेड मतदारसंघामध्ये आगामी होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष पूर्ण ताकद लावून लढणार आहे, त्यामुळे सर्व इच्छुक शिवसैनिकांनी आता तयारीला लागावी, असे आवाहन अहिल्यानगरचे जिल्हा उपप्रमुख राजेंद्र दळवी यांनी कर्जत येथे बोलताना केले.

आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कर्जत-जामखेड मतदार संघामधील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहामध्ये जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाली.

यावेळी कर्जत तालुकाप्रमुख बळीराम यादव, जामखेड तालुका प्रमुख मयूर डोके, समन्वयक सुभाष जाधव,

तालुका संघटक मालोजी काकडे, महावीर बोरा, गणेश उगले, दीपक मांडगे, नाझीम काझी, बबन दळवी, बबन जंजिरे, शिवाजी नवले, सुभाष सुद्रिक, महेंद्र धोदाड, राजीव घालमे, अशोक जाधव, डॉ. गव्हाणे, सुहास मदने, भरत पवार, कृष्णा रंधवे, माऊली जंजिरे उपस्थित होते.

ही बैठक झाल्यानंतर कर्जत येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये राज्यातील महायुती सरकारच्या विरोधात शिवसैनिकांनी हातामध्ये भगवे झेंडे घेऊन सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी सुभाष जाधव, मालोजी काकडे, मयूर डोके पाटील यांची भाषणे झाली.

> आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्व शिवसैनिकांना तयारी करण्यासाठी आदेश दिले आहेत. राज्यातील सरकार हे फसवून व खोट्या मतांची आकडेवारी तयार करून सत्तेवर आले आहे. आता हे सर्व जनतेच्या लक्षात आले आहे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊ म्हणून सत्ता मिळवणाऱ्या या सरकारचा खरा चेहरा जनतेसमोर आणावा व आगामी सर्वच निवडणुकांसाठी शिवसैनिकांनी तयारीला लागावे.
> – राजेंद्र दळवी, उपजिल्हाप्रमुख

अगस्ती आश्रम पायी पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना रेनकोट वाटप

जनता आवाज वृत्तसेवा

अकोले: अकोले तालुक्यातील अगस्ती ऋषी आश्रम, अकोले ते पंढरपूर या पायी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांना रेनकोट वाटप करून डॉ. विश्वासराव आरोटे यांनी स्तुत्य उपक्रम राबवला आहे. या कार्याबद्दल पालखी सोहळ्याचे अध्यक्ष राजेंद्र महाराज नवले यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

अकोले तालुक्यातून विठ्ठल भेटीसाठी निघालेल्या वारकऱ्यांचा उत्साह ओसंडून वाहत असताना, नगर तालुक्यातील दहेगाव येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली रेनकोट वाटप करण्यात आले. या प्रसंगी पालखी सोहळ्याचे अध्यक्ष राजेंद्र महाराज नवले, विश्वस्त हभप दीपक महाराज देशमुख, गणेश महाराज वाकचौरे, हभप रमेश महाराज भोर यांची उपस्थिती लाभली.

या उपक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, राज्य समन्वयक संजय फुलसुंदर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवाजीराव नाईकवाडी मामा, उद्योजक राहुल पाबळकर, अहिल्यानगर जिल्हा सिव्हिल सर्जन डॉ. ओंकार शेदुरकर आदी मान्यवर सहभागी झाले होते. हा उपक्रम पालखी सोहळ्याच्या सेवाभावनेचा आणि सामाजिक जबाबदारीचा आदर्श ठरत आहे.

> वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंगाची सेवा आहे. अगस्ती देवस्थानतर्फे अतिशय सुंदर नियोजन करून हा सोहळा पार पडतो, आणि अशा पवित्र कार्यात आम्ही पत्रकार सदैव मदतीसाठी सज्ज आहोत.
> – डॉ. विश्वासराव आरोटे

४ जुलै रोजी श्रीरामपूर येथे पेन्शनर्स मेळावा

जनता आवाज वृत्तसेवा

शिरसगाव : राष्ट्रीय संघर्ष समिती अहिल्यानगर यांच्यावतीने उत्तर जिल्ह्यातील विशेषतः श्रीरामपूर आणि शैजारील तालुक्यातील सर्व ईपीएस पेन्शनरांच्या, पेन्शन वाढीसाठी कमांडर राउत यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या लढ्याची सध्याची वस्तूस्थिती व पुढील रणनीती यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी शुक्रवार दि.४/७/२०२५ रोजी सकाळी ११ वा., काँग्रेस भवन, डावखर रोड, श्रीरामपूर येथे मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

आपली मागणी दरमहा पेन्शन रु.७५००/ व निगडित महागाई भत्ता आणि मोफत वैद्यकीय सुविधा अशी असून सध्या प्रसार माध्यमांतून विविध तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.त्यातून पेन्शनरांची एकप्रकारे दिशाभूल केली जात आहे.त्यामुळे नेमकी वस्तुस्थिती समजावून घेणे आवश्यक आहे.कोणीही खोट्या अफवांवर विश्वास ठेवू नये.याबाबत सत्य स्थिती सम जून घेण्यासाठी पेन्शन धारकांनी उपस्थित राहावे.यावेळी सुभाषराव पोखरकर संघटक पश्चिम भारत क्षेत्र अजितकुमार घाडगे प्रांतीय संघटक महाराष्ट्र,. देविसिंग अण्णा जाधव अध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र . बापूराव बहिरट संघटक , उत्तर महाराष्ट्र,हे मार्गदर्शन करणार आहेत.

श्रीरामपूर व उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त पेन्शनरांनी उपस्थित राहावे असे आवाहन संपतराव समिंदर जिल्हाध्यक्ष,श्रीमती आशाताई शिंदे, अध्यक्षा महिला आघाडी,सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी राष्ट्रीय संघर्ष समिती अहिल्यानगर.यांनी केले आहे.

वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासन सज्ज

सभापती राम शिंदे; जामखेडमध्ये श्री संत वामनभाऊ महाराज पालखीचे स्वागत

जनता आवाज वृत्तसेवा

जामखेड : दिंडीतील वारकऱ्यांच्याकुठलीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासन सज्ज असून, सर्व यंत्रणा सतर्कपणे काम करत आहेत. तसेच शेतकरी सुखावला असून, यंदा वारकरी व शेतकऱ्यांची संख्या रेकॉर्डब्रेक आहे. शेतकऱ्यांवर कोणतेही संकट येऊ नये, अशी पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले.

श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पालखीचे जामखेड शहरातील तपनेश्वर येथे मोठ्या भक्तिभावात आणि उत्साही वातावरणात आगमन झाले. यावेळी पालखी सोहळ्यानिमित्त आलेल्या वारकऱ्यांचे जामखेड नगर परिषद बांधकाम विभागाच्या सभापती तथा माजी नगरसेविका राजश्रीताई मोहन पवार मित्र परिवाराच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. तसेच वारकऱ्यांसाठी फराळाचे वाटप विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, माजी सभापती डॉ. भगवान मुरूमकर, बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, रवि सुरवसे, मनोज कुलकर्णी, प्रविण चोरडिया, भाजप शहरमंडल अध्यक्ष संजय काशिद, तालुका अध्यक्ष बापूराव ढवळे, डॉ. संजय भोरे,माजी नगराध्यक्ष सोमनाथ राळेभात, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, पवन राळेभात, मोहन गडदे, अमित जाधव, नवनाथ सुरवसे, विक्रांत घायतडक, सुरज काळे, तपनेश्वर हनुमान मंदिर समितीचे संचालक गणेश मासाळ, डॉ. अशोक बांगर, डॉ. प्रकाश कारंडे, उद्योजक लहू पवार, उमेश माळवदकर, रमेश धोत्रे, राजेंद्र शेलार, सुरज पवार, अर्थराज गायकवाड, दशरथ बिरंगळ यांच्यासह विविध भजनी मंडळे, भाविक आणि भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीक्षेत्र गहिनीनाथगड येथून पंढरपूरकडे मार्गस्थ झालेली ही पालखी, मठाधिपती महंत श्री विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे भाविकांच्या आस्थेचा आणि श्रद्धेचा वारसा जपत पुढे सरसावली.

> वर्षानुवर्षांची परंपरा जपत श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पालखी व दिंडीचे शहरात भव्य स्वागत करताना मला आनंद वाटतो. नगरसेविका राजश्रीताई मोहन पवार यांच्या वतीने वारकऱ्यांना फराळ वाटप करण्यात आले. राज्य शासनाने रेनकोट व विविध सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.
> – प्रा. राम शिंदे, विधानपरिषद सभापती

खा. आदिक संस्थेच्या जगतापांचा सेवापूर्ती सोहळा

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या शिरसगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल व महाविद्यालयात ३४ वर्षे सेवेतून सेवामुक्त झालेल्या शिक्षिका उषा जगताप यांना या महाविद्यालयाच्या वतीने सेवापूर्ती सोहळ्यात सोमवारी प्राचार्य सुभाष काळे व सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी यांच्या वतीने मानपत्र व शाल श्रीफळ देऊन सन्मानित केले व भावी आयुष्यास शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी शाळेच्या वतीने दोन्ही बाजूस विद्यार्थी उभे करून फुलांनी भव्य स्वागत केले व खा. स्व. गोविंदराव आदिक व विद्या देवता सरस्वतीमाता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांनी केले. प्राचार्य सुभाष काळे यांनी प्रास्तविक व स्वागत केले. यावेळी काही विद्यार्थी तसेच उषा जगताप, माजी मुख्याध्यापक मच्छिंद्र जगताप, राहुल जगताप, आशा दांगट आदींनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. जगताप कुटुंबियांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना स्नेह भोजन देण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रकाश बागुल यांनी केले. उषा जगताप व मच्छिंद्र जगताप या दोघांनी याच शाळेत शिक्षक पदावर कार्य केले. शाळा उभारणीच्या वेळी मोलाचे योगदान दिलेव दोन पिढ्या विद्यार्थी घडविले, असे प्राचार्य सुभाष काळे यांनी सांगितले.

कर्जतमध्ये डांबरी रस्त्यावर टाकला मुरूम

सार्वजनिक बांधकाम खात्याचे काम चव्हाट्यावर

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : येथील सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अनेक कारणे रोज बाहेर येत आहे. बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कर्जत ते चोंडी या रस्त्यावर गवंडी गल्ली या परिसरामध्ये डांबरी रस्ता असताना त्या रस्त्यावर चक्क मुरूम टाकला आहे. यामुळे स्थानिक नागरिक संतप्त झाले असून, डांबरी रस्त्यावर मुरूम टाकणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाचे आता नेमके करायचे काय? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या कृतीच्या विरोधात नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी अहिल्यानगर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कधीतरी कर्जत येथील कार्यालयास भेट देऊन त्यांच्या कामाचा आढावा घेऊन चाललेल्या कामाची पाहणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

कर्जत येथील सार्वजनिक बांधकाम विभाग हा अस्तित्वात आहे की नाही? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. या ठिकाणी अधिकारी फक्त नावालाच असून ते कार्यालयामध्ये कधीही आढळत नाही. कोट्यवधी रुपयांची कामे कार्यक्षेत्रामध्ये सुरू असताना प्रत्यक्षात कोणत्याही काम ावर अधिकारी किंवा त्यांचे इंजिनियर आढळत नाही. ठेकेदारांनी मनमानी पद्धतीने व त्यांना पाहिजे त्या पद्धतीने कामे सुरू आहेत त्यांच्या दर्जा विषयी मोठी शंका उपस्थित केली जातात.

कर्जत ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हा राज्याचे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या गावाकडे जाणारा रस्ता आहे. हा रस्ता शहरातील गवंडी गल्ली इथून जातो. गवंडी गल्लीमध्ये असणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणाम ध्ये खड्डे पडले होते. या खड्ड्यांमध्ये खडी व डांबर टाकण्याची आवश्यकता असताना शारीरिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या डांबरी सडकेवर चक्क मुरूम टाकला आहे. त्यामध्ये मोठमोठे दगड देखील आहेत. यामुळे आता पावसाळ्याम ध्ये पाऊस पडल्यावर त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये चिखल होऊन परिसरातील नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागणार आहे. याशिवाय वृद्ध महिला यांना पायी जाताना तसेच वाहन चालकांना मुरूम टाकल्यामुळे अडथळा निर्माण होत आहे.

रानडुकरांमुळे पुणतांबा परिसरातील शेतकरी त्रस्त

जनता आवाज वृत्तसेवा

पुणतांबा : परिसरात आता हरणांचे कळप, बिबट्यांसोबतच रानडुकरांचा वावर वाढल्यामुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

शेती महामंडळाच्या चांगदेवनगर मळ्यावर पाटपाण्याच्या कमतरतेमुळे महामंडळाने २००७-२००८ पासून महामंडळाच्या मालकीच्या जमीनीची मशागत करणे थांबवले होते. या निर्णयामुळे परिसरात वेड्या बांभळीची जंगले वाढली होती. परिणामी, हरणांच्या कळपांची संख्या वाढली होती. त्यामुळे डेरानाला वाकडी रोड, धुमाळ माथा, मातुलठाण रोड, पुरणगाव रोडसह काही भागात हरणांची संख्या वाढली होती. ज्यामुळे परिसरातील पिकांचे नुकसान होण्याचे प्रमाण वाढले. महामंडळाच्या चांगदेवनगर मळ्याने ७० टक्के जमीन संयुक्त शेतीसाठी कराराने दिल्यामुळे हे क्षेत्र वहिवाटीसाठी येऊन त्यात पिके घेण्यास सुरुवात झाली. त्याचा परिणाम म्हणून हरणांना

निवाऱ्यासाठी जंगल नसल्यामुळे अनेक कळपांनी इतरत्र स्थलांतर केले आहे. असे असले तरी अजूनही परिसरात हरणांचे कळप आहेत, सध्या अपुरा पाऊस तसेच भक्ष्य शोधण्यासाठी ही कळपे रानोमाळ फिरत असून पिकांचे नुकसान करत आहेत. मध्यंतरी परिसरात बिबट्यांचा वावर वाढला होता, पण आता मात्र गेल्या काही दिवसांपासून परिसरात रानडुकरांचे प्रमाण वाढले आहे. ही रान डुकरे आहेत की गावातील डुकरे याचा अंदाजही शेतकरी वर्गाला लागत नाही.

वहाडणे यांची ही मागणी

तीन दिवसांपूर्वी येथील डेरानाला भागात चरांमध्ये दिवसा ३ ते ४ रानडुकरे शेतकऱ्यांना दिसून आली. येथील उसाच्या लागवडीतही ती फिरतांना आढळून आली. त्यामुळे शेतकरी वर्ग भांबावलेला आहे. सामाजिक वनीकरण विभागाने डुकरांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी मनसेचे शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष संदीप वहाडणे यांनी केली आहे.

महाएल्गार आंदोलनाचे आयोजन : ॲड. पोळ

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : अनुसूची जातीच्या आरक्षण लाभापासून अनेक जात समूह वंचित आहेत. लाभ वंचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी आरक्षण उप- वर्गीकरण करण्यात यावे, असा ऐतिहासीक निकाल देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने दि. १ ऑगस्ट रोजी दिला आहे. मात्र महाराष्ट्र शासन स्तरावर आरक्षण वर्गीकरण करण्यासाठी टाळाटाळ करीत आहे. त्याम ुळे दि. १० जुलै रोजी आझाद मैदान मुंबई येथे आरक्षणाचे उपवर्गीकरण विधेयक मंजुर झालेच पाहिजे. या ागणीसाठी लोक स्वराज्य आंदोलनाचे वतीने लोक स्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्रजी भरांडे सर यांच्या नेतृत्वाखाली महा एल्गार आंदोलन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती लोक स्वराज्य आंदोलनाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. नितीन पोळ यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. ॲड. पोळ म्हणाले की, देशातील अनुसूचीत जातीच्या जात समुहाच्या शैक्षणिक सामाजिक व आर्थिक विकासासाठी महात्मा फुले राजश्री शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाची संकल्पना मांडली. कमकुवत सम ाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी राजश्री शाहू महाराज यांनी आरक्षणाची तरतूद केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटनेत १३ टक्के आरक्षणाची तरतूद करून खऱ्या अर्थाने सामजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात साकार केली आहे. मात्र देशातील विविध राज्यात देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी अनुसूचीत जाती व जमाती मधील अनेक जात समूह आरक्षणाच्या लाभापासून वंचित आहे.

करकंडे यांचे अभियंता पदवी परीक्षेत यश

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : वडझिरेचे सुपुत्र शुभम सुभाष करकंडे याने मे २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बांधकाम अभियंता पदवी परीक्षेमध्ये ९.२५ ग्रेडसह विशेष श्रेणीत यश संपादन केले आहे. पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पिरंगुट येथील अनंतराव पवार महाविद्यालयात शिक्षण घेतले. 'कमवा व शिका' या तत्वाचा आधार घेत त्याने शिक्षण पूर्ण केले. शुभमचे यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्याच्या या यशामध्ये डेक्कन मराठा शिक्षण संस्थेचे विशेष सहकार्य लाभले.त्याच्या या उत्तुंग यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, पारनेर पंचायत समितीची माजी सभापती नंदाताई करकंडे, भाग्यश्री करकंडे, ज्येष्ठ विधिज्ञ, विनायकराव करकंडे, विकास शेंडकर, दादाभाऊ मोरे, पोपट शेटे, भास्करराव लंके, चेअरमन शिवाजीराव वराळ, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सचिव सुरेश खोसे पाटील, पत्रकार विकास शेंडकर, किसन चौधरी, शंकर चौधरी, नवनाथ शेंडकर, सोपानराव करकंडे, गुजानंद निघुट, विजयकुमार एरंडे, सचिन करकंडे व इतरांनी कौतूक केले आहे.

७८ वर्षानंतर कुंभारी-शिर्डी रस्त्याचे काम

आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नांना आले यश

जनता आवाज वृत्तसेवा

कोळपेवाडी : कोपरगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यानंतर अनेक रस्त्याचे कामे मार्गी लागली आहेत. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतर कुंभारी ते शिर्डी या ८ किलोमीटर रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत जवळपास दीड कोटी रुपये खर्च करून रस्त्याचे खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण मार्गी लागल्यामुळे या रस्त्याचा वापर करणाऱ्या कुंभारी, देर्डे, कोपरगाव, हिंगणी, मढी आणि शिर्डी या रस्त्यावरून जाणाऱ्या सहा गावातील लोकांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे.

शेती उत्पादने तालुक्याच्या ठिकाणी नेताना मोठी सुविधा प्राप्त झाली आहे. त्याबरोबरच या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना देखील प्रवास सुखकर झाल्यामुळे या रस्त्यावर अवलंबून असलेल्या जवळपास ६ गावांतील लोकांचा रस्त्याबाबतचा प्रश्न या डांबरीकरणामुळे मार्गी लागलेला आहे. त्याबरोबरच कुंभारी ते काळे वस्ती मढी या पाच किलोमीटर रस्त्याचे काम देखील सुरू झाल्यामुळे या परिसरातील ग्राम स्थांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

ग्रामीण भागातील रस्ते हे विकासाच्या धमण्या असल्यामुळे या रस्त्याचे डांबरीकरणाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांचा अनुशेष भरून काढण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्ते शेतकरी बांधवांना वरदान ठरत आहेत आणि या रस्त्याने प्रवास करणे सुलभ झाले आहे. कुंभारी ते देर्डे हा रस्ता गेल्या ७५ वर्षापासून विकासापासून वंचित होता. ग्रामीण भागातील लोकांनी या रस्त्याचे काम मार्गी लावण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केला होता. त्या मागणीची दखल घेऊन शासन स्तरावर पाठपुरावा करून हा रस्ता काही दिवसांपूर्वीच डांबरीकरण झाला आहे.

भिंगार येथे महाराजस्व समाधान शिबिर

जनता आवाज वृत्तसेवा

आहिल्यानगर : भिंगार मंडळातील नागरदेवळे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार संजय शिंदे, अपर तहसीलदार स्वप्निल ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. या शिबिराला भिंगार मंडळातील सर्व गावांमधून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सकारात्मक प्रतिसाद दिला.

नागरिकांना संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, रेशन कार्ड, नॉन क्रिमिनल, उत्पन्नाचे दाखले देण्यात आले. या शिबिराप्रसंगी भाजप तालुकाध्यक्ष राम पानमळकर, राहुल गोंधळे, यशवंत पानमळकर व परिसरातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. भिंगार मंडळाधिकारी वैशाली दळवी, भिंगार मंडळातील सर्व तलाठी दीपाली मेहेर, आदित्य निकम, नागेश गणगे, वैशाली वाघ, माधुरी नामदे, मनीषा शिरसाठ, गोकुळ सुरणकर, इरफान शेख, मंडळातील सर्व कोतवाल, सर्व सेतू चालक उपस्थित होते. एका छताखाली अनेक सेवा ही संकल्पना या शिबिराच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरविण्यात आली. एकाच ठिकाणी सेवा मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

साकुरी येथे कृषी दिनानिमित्त शेतकरी चर्चासत्र

स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

जनता आवाज वृत्तसेवा

लोणी : पद्मभूषण लोकनेते डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषि शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या लोणी येथील कृषी महाविद्यालयाने राहाता तालुक्यातील साकुरी येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषि दिन व शेतकरी चर्चासत्राचे आयोजन केले होते.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, कृषि संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रास प्रा. रोहित पलघडमल आणि संदिप गायकवाड यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

प्रगतशील शेतकरी मधुकर दंडवते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चासत्रास रमाकांत रोहोम, यमाजी रोहोम, नामदेव रोहोम, पुंडलिक रोहम, संदीप दंडवते, दत्तात्रय बनसोडे,छोटू रोहम, सचिन दंडवते, दत्तू बावके, भास्कर दंडवते, अभय रोहोम, अनिल रोहम, बाळासाहेब बनसोडे, अवि दंडवते, अशोक थोरात, आण्णा रोहम आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

यशस्वी चर्चासत्राचे प्रास्ताविक डॉ. रमेश जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रगतशील शेतकरी रणजित रोहोम यांनी केले. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दिलीप महाले, कार्यक्रम अधिकारी प्रा. अक्षया वाळुंज, डॉ. विक्रम अनाप यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिकन्या झाल्टे मनीषा, कार्तिकी जोशी, भक्ती कोते, हर्षदा कातोरे, वैभवी वसावे, जानवी पटेल, वैष्णवी डावरे आदींनी प्रयत्न केले.

नेमबाई माता मंदिर वर्धापन दिन उत्साहात

जनता आवाज वृत्तसेवा

कोल्हार : येथील नेमबाई माता मंदिरात वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या मंदिरामध्ये स्थापन केलेले मूर्तीचे अतिशय तेजोमय देखणे स्वरूप भाविक भक्तांना भुरळ घालणारे आहे. तसेच देवीची भक्ती भावाने आराधना केल्यास ही देवी नवसाला पावणारी असल्याचे भाविक भक्तांनी स्वअनुभव वरून सांगितले. आज एक वर्ष पूर्ण झाल्या त्यानिमित्त श्री नेमबाई मंदिराचा वर्धापन दिन सर्व निबे पाटील परिवाराच्यावतीने अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम देवीचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर हवन युक्त दुर्गा सप्तशती पाठ वाचन व चंडीयाग झाल्यानंतर सर्व भाविक भक्तांच्या उपस्थितीत देवीची महाआरती करण्यात आली. त्यानंतर जय गुरुदेव सत्संग यांचा देवीच्या गीतांचा सुमधुर आवाजात संगीतमय कार्यक्रम झाला. यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यानिमित्त सामुदायिक हवन युक्त दुर्गा सप्तशती पाठ वाचन व चंडीयागचे आयोजन करण्यात आले होते. या सेवेसाठी परिसरातील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातील सर्व महिला सेवेकरी तसेच भाविक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

ज्ञानवर्धिनी परीक्षेत 'मुलिकादेवी'चे यश

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : श्री मुलिकादेवी विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ६ वी व इयत्ता ७ वी ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत इयत्ता ६ वी ८५ विद्यार्थी बसले, त्यापैकी ४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

इयत्ता ६ वी चा शेकडा निकाल शेकडा ५८. ३३ टक्के लागला तर इयत्ता ७ वी ८४ विद्यार्थी परीक्षेस बसले, त्यापैकी ६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि शेकडा निकाल ७७. ११ टक्के लागला. इयत्ता ६ वी मध्ये सानिका रमेश पवार या विद्यार्थीनीने ३०० पैकी २८६ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत ४ था क्रमांक मिळवला तर लाळगे आदित्य नवनाथ या विद्यार्थ्याने ३०० पैकी २८० गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत ७ वा क्रमांक मिळवला.इयत्ता ७ वी मधील स्वराज सत्यवान लंके याने ३०० पैकी २९४ गुण मिळवून जिल्ह्यात २ रा क्रमांक पटकवला, तर अलिया महेबूब इनाम दार हिने ३०० पैकी २९२ गुण मिळवून जिल्ह्यात ३ रा क्रमांक मिळवला आणि अलिना इलियास मोमीन हिने ३०० पैकी २७६ गुण मिळवून जिल्ह्यात ११ वा क्रमांक मिळवला. विद्यालयातील शिक्षक दादासाहेब ठवाळ, बाबाजी शिंदे, प्रवीण आवारी, अरुण काळे, गणेश बारामते, शिक्षिका सुनताज इनामदार, प्रिया लहारे, अनिता काळे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

विविध योजना व नागरिकत्वाच्या पुराव्याचे वाटप : प्रांताधिकारी नितीन पाटील

जनता आवाज वृत्तसेवा

जामखेड : महसूल व वन विभाग तहसील कार्यालय जामखेड व ग्रामीण विकास केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान जगदंबा लॉन्स खर्डा रोड जामखेड या ठिकाणी घेण्यात आले.

शिबिर कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व भारतीय संविधान प्रास्ताविकेला मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख

पाहुणे विनोद लोंढे (सहाय्यक आयुक्त इतर मागास), तहसीलदार गणेश माळी, ॲड. डॉ. अरुण आबा जाधव (संस्थापक, अध्यक्ष ग्रामीण विकास केंद्र)जामखेड उपस्थित होते.

या मान्यवरांचे महसूल व वनविभाग तहसील कार्यालय जामखेड व ग्रामीण विकास केंद्र यांच्या वतीने स्वागत करून सन्मान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज व महाराजस्व समाधान शिबिरामध्ये विविध विभागाचे एकूण १८ सेवांचे लाभाचे वितरण करण्यात आले सदर शिबिरास अंदाजे ८०० महिला व पुरुष उपस्थित होते. या शिबिरास जामखेड तालुक्यातील भटके विमुक्त समाजातील जाती-जमातींना जास्तीत जास्त लाभ वितरण करण्यात आले आहे.नितीन पाटील उपविभागीय अधिकारी कर्जत म्हणाले की, जातीच्या दाखल्यावाचून कोणीही वंचित राहणार नाही. महाराष्ट्र शासनाचा लाभ खरंतर लाभार्थ्यांनी घेतला पाहिजे. आजचे शिबिर लाभार्थ्यांच्या हिताचे आहे, जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनाचा लाभ घ्यावा, असे पाटील म्हणाले.

विविध योजना लाभार्थीची आकडेवारी

जात प्रमाणपत्र १८६, भटके विमुक्त समाजातील भटकंती करणाऱ्या कलाकार नागरिकांना ओळखपत्र २००, मतदान ओळखपत्र २०, शिधा पत्रिका १००, विशेष सहाय्यक विभाग यांचे निराधार व्यक्तींना लाभ वितरण ४९, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना लाभ वितरण ३, नैसर्गिक आपत्तीमुळे पशुधनाची नुकसान अनुदान वितरण ४, गाव नमुना ७/१२ वाटप ५९, गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजना वारसांना लाभ कृषी विभाग ८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना लाभ वितरण पंचायत समिती १६ आदी दाखल्यांचे वाटप करण्यात आले आहे.

अस्मिता

त्वचा विकारांचा धोका

पावसाळा सुरू झाला की, त्वचेच्या विकारांचा धोका वाढू शकतो. पावसात भिजणे, ओले कपडे अंगावर घालूनच दिवसभर वावरणे, अर्धवट वाळलेले कपडे, विशेषत: अंतर्वस्त्र वापरणे या सर्व गोष्टींमुळे काखेतील, जांघेचील त्वचा ओलसर राहून त्वचेच्या समस्या वाढू शकतात. त्यासाठी काळजी घ्यावया अशा काही बाबी...

* पावसाळ्यात घट्ट कपडे घालणे टाळा. थोडे सैलसर, सुती कपडे घालावेत. पावसात भिजला तरी हे कपडे लगेच वाळतात आणि पुढील त्रास टळतो. ऑफिस बॅगमध्ये, पर्समध्ये कपड्यांची एखादी जास्तीची जोडी ठेवावी. खूप भिजल्यास ओलेत्याने न वावरता शरीर शक्य तितके कोरडे करण्याचा प्रयत्न करावा. हात-पायांच्या बोटांमधील जागा पूर्ण कोरडी करावी. संपूर्ण वाळलेले आतले कपडे (अंतर्वस्त्र) वापरावे. अन्यथा या संवेदनशील भागांमध्ये त्वचेचा संसर्ग होऊ शकते.
* पावसात ओले मोजे वापरू नका. दुसऱ्यांचा कंगवा, टॉवेल वा कपडे तर अजिबात वापरू नका. पादत्राणांमधील पाणी पूर्ण काढा आणि नंतर ते वाळवा. बूट वापरावे लागलेच तर त्यात बिलकूल पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्या. पुढील वापरापूर्वी बूट पूर्ण कोरडे करा. अन्यथा त्वचा विकार वाढीस लागू शकतात. पाणी साचणार नाही अशा पादत्राणांचा वापर करा. तसेच हाता-पायांची नखे वेळच्या वेळी कापा. अँटी-बॅक्टेरिअल साबण वापरा. या सर्व उपायांनी तुम्ही त्वचेचा संसर्ग रोखू शकता. तरीही संसर्ग झाल्यास त्वरित डॉक्टरांना दाखवून वेळच्यावेळी औषधे घ्या. ते सांगतील ते उपचार पूर्ण करा. अन्यथा संसर्ग वाढू शकतो.
* त्वचा ओलसर राहिल्यामुळे हाता-पायाच्या बेचक्यांमध्ये, काखेत, जांघेत खाज येते आणि संसर्ग वाढतो. रिंगच्या आकारातील, लालसर रंगाचे आणि प्रचंड खाज सुटणारे गजकर्णसारखे संसर्ग हातावर, पाठीवर, पोटावर, चेहरा आणि केसांमध्येही होऊ शकते. हा आजार लहानांपासून-मोठ्यापर्यंत कोणालाही होऊ शकतो. हा त्रास संसर्गजन्य असल्याने एकाकडून दुसऱ्या व्यक्तीकडे सहज पसरू शकतो. मात्र व्यवस्थित उपचार घेतल्यास तो सहज बरा होऊ शकतो.

'प्रीशिका'ची भुरळ

कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्यात स्त्रियाही आता मागे नाहीत. त्या आता सक्षमपणे पूर्ण कुटुंबाची जबाबदारी घेत आहेत. पण सगळ्यांसाठीच आर्थिक दृष्ट्या सक्षम होणे तितकेस सोपे नसते. अर्थात प्रचंड कष्टाने योग्य मार्ग शोधून त्या यशस्वी वाटचालीकडे कूच करतात.

मानिनी

नाशिकच्या प्रिती चव्हाण यांनी प्राप्त केलेल्या ब्युटीपार्लरच्या कौशल्यामुळे त्यांना असाचा यशाचा मार्ग सापडला. त्यांनी राहत्या घरी ब्युटीपार्लर सुरू केले आणि आर्थिक चणचणीवर मात केली. त्यांनी घरातून सुरू केलेल्या या ब्युटीपार्लरमध्ये मिळणाऱ्या सेवेला ग'ाहकांचा चांगला प्रतिसाद मिळू लागला. वेगळे काही तरी करण्याची इच्छा असल्याने सौंदर्य उपचारांसाठी त्यांनी 'प्रीशिका' या ऑरगॅनिक सौंदर्य प्रसाधनांच्या ब ँडची निर्मिती केली. ऑरगॅनिक उत्पादन असल्याने अल्पावधीत त्यांच्या उत्पादनांना चांगली मागणी वाढली. या माध्यमातून प्रिती वर्षाला पाच ते सहा लाखांपर्यंत वार्षिक उलाढाल करत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून सर्व वयोगटातील स्त्री, पुरुष आपल्या दिसण्याबाबत अधिक सजग झाले आहेत. विशेषत: महिला याबाबत अधिकच सजग असतात. सौंदर्य आणि त्वचेची काळजी घेण्याच्या आवडीनिवडींमध्ये देखील हा बदल दिसून येतो. हीच बाब हेरत ब्युटी पार्लरसाठी आवश्यक कौशल्य, बारकावे शिकत त्यांनी हे पाऊल उचलले. दिवसेंदिवस ग'ाहकांची गर्दी वाढू लागल्याने त्यांनी विविध प्रकारची यंत्रसामग'ी, उत्पादने, ब्युटी पार्लरसाठी लागणारे विविध साहित्य असा सर्व सेटअप तयार केला.

लग्नाच्या हंगामामध्ये बाहेरील ऑर्डरदेखील मिळू लागल्याने त्यांच्या ब्युटी पार्लरच्या व्यवसायाला चांगलीच गती प्राप्त झाली. महिला उपचारासाठी त्यांच्या पार्लरमध्ये येत, तेव्हा त्या कोणते प्रॉडक्ट वापरतात, ते ऑरगॅनिक आहे का, त्या प्रॉडक्टचा चेहऱ्यावर वा शरीरावर कोणताही वाईट परिणाम होणार नाही ना असे प्रश्न विचारत असत. त्यातूनच त्यांना गुणवत्तेची खात्री देता येतील अशी सौंदर्य प्रसाधने स्वत: बनवण्याची कल्पना सुचली. त्यासाठी क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत चर्चा करून त्यांनी माहिती घेतली. सौंदर्य प्रसाधने बनविण्यासाठी आवश्यक असलेला कॉस्मेटिक क्षेत्रातील पदविका अभ्यासक' मदेखील त्यांनी पूर्ण केला. सर्वप्रथम त्यांनी हेअर ऑईल तयार केले.

ग'ाहकांनी संपूर्ण सेंद्रिय वस्तूंपासून तयार केलेल्या तेलाचा वापर केला आणि खूप चांगला प्रतिसाद दिला. नंतर त्यांनी स्किन टोनिंग साबण, केस वाढीसाठी हिना पावडर, चारकोल साबण अशा विविध उत्पादनांची निर्मिती केली. सोशल मीडिया, ब्युटी पार्लरमध्ये येणारे ग'ाहक या माध्यमातून त्यांनी टप्प्याटप्प्याने व्यवसाय वाढवला. आता शहरासह, देशभरातही त्यांच्या सौंदर्य प्रसाधनांना पसंती मिळत आहे. विशेष म्हणजे ही उत्पादने त्या मुलींच्या मदतीने तयार करतात. व्यवसायाचा वाढता विस्तार, तसेच ब्युटी पार्लरची वाढती सं'या लक्षात घेता आता मोठ्या जागेत पार्लर सुरू करण्याच्या दृष्टीने त्यांनी नियोजन सुरु केले आहे. प्रसाधनांच्या गुणवत्तेवर अधिक लक्ष दिल्यामुळे ग'ाहकांकडूनही त्यांना पसंती मिळत आहे आणि तेच प्रिती यांच्या यशाचं गमक आहे.

पम्पकीन अँड पीनट बटर सूप

रुचिरा

अनेकजण भोपळ्याचं नुसतं नाव घेतलं तरी नाक मुरडतात. त्यातल्या त्यात लाल भोपळ्याला तुलनेने कमी तिरस्काराचा सामना करावा लागतो. लाल भोपळा मुलांनी आवडीने खावा यासाठी भाजी करण्याऐवजी सूपच्या स्वरुपात द्यावा. सध्याच्या वातावरणात गरमागरम पम्पकीन आणि पीनट बटर सूप ट्राय करून बघाच.

साहित्य – चार टीस्पून बटर, चार वाट्या लाल भोपळा खिसून (फ्राय करून), दोन वाटी गोडसर चवीचे बटाटे उकडून, मॅश करून, एक वाटी बारीक चिरलेला कांदा, बारीक चिरलेला दोन पाकळ्या लसूण, एक वाटी पीनट बटर, एक टी स्पून काळी मिरीपूड, सहा वाट्या व्हेजी स्टॉक, एक कप दूध, काजू आणि कोथिंबीर (सजावटीसाठी), चवीपुरतं मीठ

कृती – सर्वप्रथम बटाटे आणि लाल भोपळ्याचा खिस मिसळून घ्यावा. त्यात बटर टाकून एकजीव करावं. आता या मिश्रणात व्हेजी स्टॉक, कांदा, लसूण, मिरीपूड आणि मीठ मिसळून घ्यावं. या मिश्रणाला एक उकळी येऊ द्यावी. त्यानंतर मिश्रण गॅसवरून उतरवावं. थंड झाल्यावर मिश्रण ब्लेंड करून घ्यावं. त्यामुळे मिश्रण मऊ, दाट आणि एकजीव होईल. त्यानंतर या मिश्रणात दूध आणि पीनट बटर मिसळून घ्या. पुन्हा मिश्रण गॅसवर ठेवून दाट होईपर्यंत शिजवावं. सूप शिजल्यावर कोथिंबीर आणि काजूच्या कापांनी सजावट करावी.

कर्लिंगचा इझी मंत्रा

हेअर केअर

अचानक संध्याकाळच्या पार्टीचं आमंत्रण आल्यावर सगळ्यात मोठा प्रश्न पडतो तो म्हणजे हेअर स्टाईल काय करायची. ग्लॅम पार्टीसाठी जाणार असाल तर कर्ली हेअर स्टायलिंग ट्रेंड लोकप्रिय आहे. कमी वेळात कर्लिंग करण्याच्या अनेक पद्धती आहेत. या पद्धतींविषयी जाणून घेऊ.

* वॉश, पीन अँड कर्ल- डीप कंडिशनिंग केल्याने केस खुलतात आणि हवा तसा लूक देणं शक्य होतं. केस धुतल्यानंतर त्यातील पाणी जाऊ द्यावं. यानंतर कर्ल पिन्सनी केस काही वेळ बांधून ठेवा. अशा स्थितीतच सुकू द्या. केस सुकल्यानंतर कर्ली होतील.
* हॉट रोलर्स- केस कर्ल करायला फारसा वेळ नसेल तर हॉट रोलर्सची मदत घेता येणं शक्य आहे.
* कर्लिंग आयरन- केस कर्ल करण्याचा सर्वात सुटसुटीत पर्याय म्हणजे कर्लिंग आयरन. पण या साधनाचा वापर करताना जरा जपूनच. कारण या आयरनचा सतत वापर केल्याने केस रुक्ष होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर असते.
* पिन कर्ल करताना केस थोडेसे ओलसर असतील याची काळजी घ्या. त्यानंतर केसांचे चार समान भाग करा. त्यानंतर केस ट्विस्ट करा. ट्विस्ट केलेले केस कॉईलच्या आकारात रोल करून घ्या. त्यानंतर काही वेळाने या केसांवरून ड्रायर फिरवा. त्यानंतर केस मोकळे सोडा. केस कर्ल झालेले असतील.
* कर्लिंगसाठी हीटिंगच्या पर्यायांचा वापर करत असाल तर डिफ्युजरचा वापर अवश्य करा. यामुळे केसांचं कमी नुकसान होईल.
* अनेकींना हीटिंग किंव पिन्सचा पर्याय आवडत नाही. त्यांच्यासाठी वेणी हा सर्वोत्तम पर्याय आहे. त्यासाठी केसांना अजिबात तेल न लावता थोड्याश्या घट्ट वेण्या घालाव्यात. एकच वेणी घालण्यापेक्षा लहान लहान वेण्या घाल्याव्यात. सकाळी केस कर्ल झालेले असतील.
* कर्ल केलेल्या केसांवर हेअर स्प्रेचा वापर करावा. जेणेकरून त्यांच्यातील ओलावा कायम राहील आणि निस्तेजही दिसणार नाहीत.

...तर शंकेच कारण नाही

समुपदेशन

मी मध्यमवयीन प्रौढा असून दोन वर्षापूर्वी मुलाचं लग्न झालं आहे. मी एका मोठ्या कंपनीमध्ये कार्यरत असून सूनही एका आंतरराष्ट्रीय कंपनीत वरच्या पदावर कार्यरत आहे. आता सून गरोदर आहे. आम्हा दोघींमधील संबंध अत्यंत सलोख्याचे आहेत. ती आणि मी अधिकाराने एकमेकींना काही गोष्टी सांगू शकतो. याच हक्काने बाळाच्या संगोपनासाठी तुम्ही व्हीआरएस घ्या, असा तिचा आग्रह आहे. बाळाचा सांभाळ करण्यासाठी मी घरी थांबावं आणि त्या दोघांनी घराची सगळी जबाबदारी सांभाळावी अशी त्यांची इच्छा आहे. पण इतकी वर्षं नोकरी केल्यानंतर घरात थांबणं मला अवघड वाटतंय. शिवाय नातवंडाची संपूर्ण जबाबदारी घेण्याचीही भीती वाटतीये. सर्वात महत्त्वाचं म्हणजे यामुळे परावलंबी होण्याची दाट शंका मनाला व्यापून आहे. यातून कसा मार्ग काढू?

– सुनेच्या या मागणीमुळे तुम्ही विचारांच्या गर्तेत सापडणं अगदी स्वाभाविक आहे. व्हीआरएसचा विचारही केला नसताना अचानक हा निर्णय घेणं तुमच्यासाठी अवघड आहे. शिवाय तुम्ही म्हणता त्याप्रमाणे परावलंबी होण्याचा धोकाही आहेच. पण सुनेशी आणि मुलाशी तुमचे चांगले संबंध असतील, एकमेकांप्रती स्नेह-आदरभाव-प्रेम-आस्था असेल तर घरी थांबून एक निवांत आयुष्य जगण्यासही हरकत नाही. बाळाला सांभाळण्यासाठी एखाद्या मदतनीसाची मदत घेऊन तुम्ही केवळ देखरेखीचं काम करु शकता. यामुळे सुनेच्या इच्छेचा मान ठेवल्यासारखं होईल आयुष्यभर कष्ट केल्यानंतर तुम्हालाही थोडा निवांतपणा अनुभवता येईल. अर्थात मुलगा आणि सुनेने तुमच्या या चांगल्या भावनेची, साह्याची किंमत ठेवणं गरजेचं आहे हे तितकंच खरं...

पाळा हे 'गोल्डन रुल्स'!

प्रत्येक स्त्रीला प्रत्येक वयात सुंदर आणि तंदुरुस्त राहायचे असते. यासाठी महिलांनी सुरुवातीपासूनच सकस आहार घेणे आणि फिटनेसकडे लक्ष देणे आवश्यक आहे. परंतु असे असूनही काही सवयी महिलांच्या फिटनेससाठी आव्हान बनतात. परिणामी, त्यांना निरोगी, तंदुरुस्त दिसण्याच्या इच्छेशी तडजोड करावी लागते. अशा परिस्थितीत ३०व्या वर्षापासून तुम्हाला दिर्घकाळ फिट राहण्यास मदत करतील अशा काही सवयी अंगिकारल्या पाहिजेत.

* **जास्त पाणी प्या:** पाण्याच्या कमतरतेमुळे जलद वृद्धत्व, मंद चयापचय आणि इतर अनेक समस्या उद्भवू शकतात. वृद्धत्वाचे परिणाम कमी करण्यासाठी अधिकाधिक पाणी प्या.
* **स्ट्रेंथ ट्रेनिंग करा:** वय वाढते तसे तुमचे स्नायू टोन करण्याची आणि ताकद वाढवण्याची क्षमता कमी होत जाते. त्यासाठी स्ट्रेंथ ट्रेनिंग घेतले आणि कार्डिओ वर्कआउट करणे फायद्याचे ठरेल.
* **व्यायामामध्ये बदल करा:** दर महिन्याला व्यायामाचे वेळापत्रक बदलल्यामुळे तोच तोपणा टाळता येईल.
* **व्यायामानंतरचा आहार:** व्यायामानंतरच्या अर्ध्या तासामध्ये तुम्ही प्रथिने आणि कर्बोदकांचे सेवन केल्यास स्नायू मजबूत होतील आणि ऊर्जा टिकू राहील.

मायक्रोब्लेंडिंग म्हणजे काय?

एकंदरीत मेकअपमध्ये काहिसा दुर्लक्षित असणारा अवयव म्हणजे भुवया अर्थात आयब्रो. मेकअप दरम्यान केवळ पेन्सिल फिरवून आयब्रोचे लाड केले जातात. पण अलीकडे कॉस्मेटिक पिग्मेंटेशनच्या सहाय्याने वेगवेगळी डिझाईन्स बनवली जातात. या प्रक्रियेला मायक्रोब्लेंडिंग म्हणतात. मायक्रोब्लेंडिंग हे एक टॅटू आर्ट आहे. यामध्ये मशीनच्या सहाय्याने हेअर इम्प्लांट केले जातात. त्यानंतर मशीनच्या सहाय्याने त्वचेमध्ये रंग भरले जातात. इतर टॅटूप्रमाणे हे फारसं कठीण नसतं. शिवाय यामध्ये सर्जरीदेखील केली जात नाही. हा एक प्रकारचा टॅटू असल्याचं कॉस्मेटिक सर्जनचं म्हणणं आहे. त्यामुळे कालांतराने हा टॅटू विरळ होण्याची शक्यता असते. टॅटू किती काळ टिकिणार हे पिग्मेंटेशनच्या दर्जावरदेखील अवलंबून असतं. योग्य प्रकारे काळजी घेतल्यास टॅटू सहा ते अठरा महिन्यांपर्यंत सहज टिकतो. या प्रक्रियेमध्ये आयब्रोचा आकार, कडा आणि गॅप भरली जाते. यामुळे आयब्रो रेखीव आणि उठावदार दिसतात. यात आयब्रोचा आकार निश्चित केला जातो. त्यानंतर त्यात पेनने फेदर लूक दिला जातो. एका पेनमध्ये १२ ते १५ मायक्रोब्लेड्स असतात. ही ट्रीटमेंट करून घेणाऱ्यांनी ट्रीटमेंटपूर्वी एक आठवडा मद्यपान करणं टाळावं. ट्रीटमेंटनंतर त्वचा मॉईश्चराईज्ड राहील याची काळजी घ्यावी. या दरम्यान वर्कआउट करणंही टाळावं.

जाणून घ्या

त्यामुळे घाम कमी येईल. ट्रीटमेंटच्या सुरुवातीला हलकी सूज किंवा लाली येण्याचा संभव असतो. त्यानंतर गरज वाटल्यास दर सहा महिन्यांनी टच अप करावं.

प्रिंटेड जेगिंग्जच्या विश्वात

फॅ शनच्या वेगवान जगात एखादी स्टाईल पाहता पाहता सर्वत्र दिसू लागते. लेगिंग्जचंही असंच काहीसं झालं. सर्व प्रकारच्या वयोगटाने आपल्याशा केलेल्या या स्टाईलचं जेगिंग्ज अपग्रेडेड व्हर्जन आहे. या स्टाईलमध्ये अलीकडे प्रिंटेड जेगिंग्जचा ट्रेंड आला आहे. या ट्रेंडविषयी...

* प्लेन टॉप किंवा टी-शर्टसोबत कॅरी करण्यासाठी प्रिंटेड जेगिंग्ज हा उत्तम पर्याय आहे. प्रिंटेड जेगिंग्ज तुम्ही जिमवेअर म्हणूनही कॅरी करू शकता. यामुळे कम्फर्ट आणि स्टायलिंग दोहोंचा मेळ जुळून येईल.
* प्रिंटेड जेगिंग्ज ऑफिसवेअर म्हणून वापरणार असाल तर शक्यतो जिओमेट्रिक डिझाईनची निवड करावी.
* आउटिंगला जाताना प्रिंटेड जेगिंग्ज ट्राय करण्याच्या विचारात असाल तर फ्लोरल प्रिंट हा सर्वोत्तम पर्याय आहे. प्लेन अपरसोबत फ्लोरल प्रिंटेड जेगिंग्ज ट्रेंडी लूक मिळवून देण्यास मदत करेल.

स्टाईल स्टेटमेंट

* पार्टीसाठी जात असाल तर सिक्विंस प्रिंटेड जेगिंग्ज हा उत्तम पर्याय आहे. कोणत्याही प्लेन क्रॉप टॉपसोबत ही जेगिंग्ज कॅरी करू शकता. यासोबत जॅकेट कॅरी करत असाल तर अल्ट्रा मॉडर्न लूक मिळण्यास मदत होईल.
* प्रिंटेड जेगिंग्जमध्ये ॲनिमल प्रिंटचा ट्रेंड सर्वत्र दिसून येत आहे. हे प्रिंट तुम्ही टॉप आणि जॅकेटच्या काँबोसोबत परिधान करू शकता.

माहीत असावं

काशाची मूर्ती आहे?

घरच्या सजावटीसाठी काशाच्या मुर्त्या हौसेने आणल्या जातात. पण कालांतराने त्यांची स्वच्छता करणं जिकिरीचं होतं. त्यासाठी सोपा उपाय म्हणजे मऊ कापडाने किंवा स्पंजने या मूर्त्या पुसून घ्याव्यात. मऊ स्पंज असेल तर मूर्त्यांचे कोपरे स्वच्छ करणं शक्य होतं. या वस्तू स्वच्छ करण्यासाठी बाजारात मिळत असलेल्या रसायनांची मदत घेणं शक्यतो टाळा. या मूर्त्या स्वच्छ करण्यासाठी लिंबाचा वापर करणं शक्य आहे.

टेक केअर

स्मोकिंगने ओठ काळवंडलेत?

स्मोकिंगमुळे ओठ काळे पडण्याची समस्या जाणवते. कितीही उपाय केले तरी हा काळपटपणा लवकर जात नाही. हे डाग दूर करायचे तर टूथपेस्टची मदत घेणं शक्य आहे. एक मऊ ब्रश घ्या. त्यावर थोडी पेस्ट घेऊन ओठांवरही रगडा. काळपटपणा काही दिवसात दूर होईल. बीटाचा रसदेखील काळ्या पडलेल्या ओठांचा रंग बदलू शकतो.

ॲक्सेसरीज

ट्रेंड 'फरी' पादत्राणांचा...

फॅशन कोणतीही असो, आरामदायी नसेल तर फार काळ टिकत नाही. त्यामुळेच अलीकडे पादत्राणांमध्येही ट्रेंड आणि कम्फर्टचं मिश्रण पहायला मिळतं. सध्या फर, स्लाईड इन, स्पा रॅप, टॅरी स्लिपर्स ट्रेंडमध्ये आहेत. वजनाला हलके आणि आरामदायी असल्याने या स्लिपर्स तरुणींच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आहेत. याशिवाय अत्यंत वाजवी दरात मिळत असल्याने खिशालाही चाट बसत नाही.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11